रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक १८९ ▌पृष्ठ ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## सिंधुदुर्गातील पुतळ्यांची रेडिओग्राफी

**रत्नागिरी :** मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटनेनंतर धास्तावलेल्या रत्नागिरी नगर परिषदेकडून खबरदारी म्हणून रत्नागिरी शहरातील सर्वच पुतळ्यांची रेडिओग्राफी करण्यात आली. मात्र, या रेडिओग्राफीचा अहवाल आल्यावरच संबंधित पुतळ्यांची डागडुजी करण्याचे काम नगरपरिषद प्रशासनाकडून हाती घेण्यात येणार आहे. रत्नागिरी नगरपरिषदेकडून शहरातील पुतळ्यांची रेडिओग्राफी नुकतीच पूर्ण करण्यात आली आहे. या पुतळ्यांची रेडिओग्राफी पूर्ण झाल्यावर कोल्हापुरातील प्रयोगशाळेतून या रेडिओग्राफीचा अहवाल प्राप्त होणार आहे. त्यानंतरच या पुतळ्यांबाबत पुढील उपाययोजना केल्या जाणार आहेत, असे रत्नागिरी नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाचे अभियंता यतिराज जाधव यांनी सांगितले.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹


## वाहनांच्या वेगमर्यादेवर कॅमेऱ्यांची नजर

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावरुन अनेक वाहनधारक नियमांचे पालन करत नाही. आता आयटीएमएस प्रणाली अंतर्गत महामार्गावर ५२ ठिकाणी दोन्ही बाजूने कृत्रिम बुद्धीमत्तेवर (एआय) आधारित कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे आता रडारतंत्राचा वापर करुन वाहनांचा वेग मोजता येत आहे. मर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवणाऱ्या वाहनांना ई-चलन पाठवण्यात येत आहे. या महामार्गावर घाट परिसरामध्ये हलके मोटार वाहनाची (कार) वेगमर्यादा ६० किमी प्रतितास आहे. उर्वरित सर्व वाहनांची वेग मर्यादा ४० किमी प्रतितास आहे. घाट परिसर वगळता इतर ठिकाणी हलके मोटार वाहन (कार) ह्यांची वेग मर्यादा १०० किमी प्रतितास असून, उर्वरित सर्व वाहनांची वेग मर्यादा ८० किमी प्रतितास आहे.

# उरणचे शेवंड, खेकडे सातासमुद्रापार

### शेवंड्यांना २ हजार, तर खेकड्यांना मिळतोय २ हजार ६०० चा भाव

### विदेशातील वाढत्या मागणीमुळे दरात वाढ

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण येथील नव्याने सुरु करण्यात आलेल्या करंजा बंदारामुळे शेवंडी आणि खेकड्यांना जागतिक बाजारपेठेत प्रचंड मागणी असून, त्यांच्या दरात वाढ झाली आहे. करंजा बंदरातून निर्यात होणाऱ्या शेवंड २ हजार, तर खेकडा २ हजार ६०० रुपये किलोप्रमाणे दर मिळत आहे. करंजा बंदरात मच्छिमारांकडून पकडण्यात येणाऱ्या शेवंड (लॉबस्टर) आणि मोठ्या आकारांचे खेकडे





यांना विदेशात मोठी मागणी असल्याने त्यांच्या दरात वाढ झाली आहे. यात किलोला १ हजर ७०० असलेला दर दोन हजार झाला आहे. तर खेकड्यांच्या दरातही वाढ झाली आहे.

याचा लाभ स्थानिक मच्छिमारांनाही होत आहे. त्यामुळे या नव्याने सुरु करण्यात आलेल्या करंजा येथील बंदरामुळे स्थानिक मच्छिमारांच्या व्यवसायाला अधिक चालना मिळत आहे. या बंदरात पकडण्यात आलेल्या शेवंडी आणि खेकड्यांना जागतिक बाजारात प्रचंड मागणी आहे. त्यामुळे सध्या या दोन्ही माशांची आवक पान २ वर

> दिवसाकाठी एक-दोन किलो शेवंड मिळाल्यास स्थानिक मच्छिमारांसाठी शेवंडीचा व्यवसाय अत्यंत फायदेशीर ठरतो. मात्र, सध्या समुद्रात शेवंड मिळण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे. त्यामुळे स्थानिक आणि पारंपरिक मच्छिमारांना आर्थिक फायदा मिळवून देणारा व्यवसाय सध्या तरी अडचणीत आला आहे.
>
> – के.एल. कोळी, मच्छिमार, करंजा

### शेवंडाचे मांस रुचकर

शेवंडाचे मांस अत्यंत रुचकर असून, खाण्यासाठी ते ताजे अथवा गोठवून वापरतात. देशभरातील पंचतारांकित हॉटेल आणि आखाती देशात या शेवंडीला मोठी मागणी आहे. मात्र, मोठ्या प्रमाणावर मागणी असली तरी समुद्रात मागील काही वर्षांपासून शेवंड मिळण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांकडूनही मागणी प्रमाणे शेवंडींचा पुरवठा होत नाही. परिणामी, पुरवठा होत नसल्याने मागणी असूनही निर्यात कंपन्यांना शेवंडींचा पुरवठा करणे शक्य होत नाही.

### भारताबाहेर मागणी

करंजामधील शेवंड आणि खेकडे हे अमेरिका, सिंगापूर यासह देशातील सात व पंचतारांकित हॉटेलमध्ये सर्व्ह केल्या जातात. अरबी समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या करंजा बंदर परिसरात अनेक छोटे मच्छिमार शेवंड आणि खेकडे पकडण्याचा व्यवसाय करीत आहेत. यासाठी मच्छिमारांना अनेक तास लागत आहेत. पारंपरिक मच्छिमारांना आर्थिक फायदा मिळवून देणारी आणि आखाती देशात मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या शेवंड (लॉबस्टर) आता मिळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमार अडचणीत आले आहेत.

**आजचा अग्रलेख**

**हा महाराष्ट्र कोणाचा?**

## वे|ध|क

### हंगामी अध्यक्षपदी कालिदास कोळंबकर

**मुंबई :** ७ डिसेंबरपासून विधिमंडळाचं विशेष अधिवेशन सुरू होणार आहे. हे अधिवेशन ७, ८ व ९ डिंसेबर असे तीन दिवस चालणार असून, या अधिवेशनासाठी कालिदास कोळंबकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. हंगामी अध्यक्ष म्हणून कोळंबकर यांनी शुक्रवारी (दि.६) शपथ घेतली.

### दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू

**खोपोली :** खोपोली-पाली रोडवरील उंबरे येथे नव्याने निर्माण होत असलेल्या कंपनीची संरक्षण भिंत कोसळून सहा कामगार जखमी झाल्याची घटना गुरुवारी घडली होती. त्यातील दोन कामगारांचा उपचारादरम्यान रात्री दुर्दैवी मृत्यू झाला, तर चार जखमी कामगारांवर उपचार सुरु आहेत. उंबरे येथे नव्याने विकसित होणाऱ्या कंपनीतील संरक्षक भिंतीचे काम सुरू होते. ही भिंत पन्नास फूट उंच असून, तिचे काम सुरू असताना अचानक ती कोसळल्याने मातीच्या ढिगाऱ्याखाली सहा कामगार अडकून जखमी झाले होते. यात धरमदेव (२५), पान २ वर

### शिंदेंची पुरती कोंडी

**मुंबई :** महायुतीचे सरकार आल्यानंतर आता मंत्रिपदांच्या वाटपाबाबत पेच निर्माण झाला आहे. गृहमंत्रालयावरून महायुतीमध्ये संघर्ष सुरू झाला. या खात्यासाठी युतीचे मित्रपक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी आमनेसामने आले आहेत. सत्तानाट्यानंतर आता खातेनाट्य सुरू झाले आहे. गृहमंत्रालयाच्या बदल्यात एकनाथ शिंदेंसमोर तीन पर्याय ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गृहखात्याइतकेच तोडीस तोड खाते मिळवण्याकरता शिवसेना आग्रही आहे. मात्र ऊर्जा, गृहनिर्माण खाते शिवसेनेला मिळण्याची शक्यता कमी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे आता एकनाथ शिंदेंची पुन्हा कोंडी झाली आहे.

### नव्या मूकबधीर विद्यालयाची इमारत कधी ?

# विद्यार्थ्यांना प्रतीक्षा

**। प्रमोद जाधव ।**

**। अलिबाग ।**

**मूकबधीर विद्यार्थ्यांना अद्ययावत असे विद्यालय उभारण्याचे काम गेल्या अडीच वर्षांपासून सुरू आहे. आतापर्यंत या इमारतीचे फक्त ३० टक्केच काम झाले आहे. ठेकेदाराच्या संथ कामामुळे हे काम अद्यापही पूर्ण झाले नाही, असा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भाड्याच्या इमारतीमधून शिक्षण घ्यावे लागत आहे. दरम्यान, नव्या मूकबधीर विद्यालयाची प्रतीक्षा विद्यार्थ्यांना लागून राहिली आहे.**



● (संग्रहित छायाचित्र)

समाजकल्याण विभागाने १९८६ मध्ये अलिबागजवळील विद्यानगर या ठिकाणी शासकीय मूकबधीर विद्यालय बांधण्यात आले होते. जीर्ण झालेल्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्यासाठी जुनी इमारत जमीनदोस्त करण्यात आली. त्यामुळे भाडेतत्त्वावरील इमारतीमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करण्यात आले. जीर्ण झालेल्या मूकबधीर विद्यालयाच्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्यासाठी १५ ऑगस्ट २०२१ मध्ये भूमीपूजन सोहळा थाटामाटात करण्यात आला होता. या इमारतीसाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून दोन कोटी ४६ लाख ९२ हजार रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. ठेकेदाराला ५० लाखांहून अधिक निधी वर्ग करण्यात आला. भूमीपूजन होऊन तीन वर्ष, तीन महिने होत आले आहेत. मात्र, अजूनपर्यंत या इमारतीचे काम संथ गतीनेच सुरू आहे. विद्यार्थ्यांना हक्काच्या शाळेची प्रतीक्षा लागून राहिली आहे. नव्या शाळेत कधी शिकायला मिळेल, अशी आशा विद्यार्थ्यांना लागून राहिली आहे.

परंतु, ठेकेदारांनी घोर निराशा केल्याची चर्चा जोर धरत आहे. आतापर्यंत फक्त तीस टक्केच काम पूर्ण झाले आहे. अलिबाग तालुक्यातील विद्यानगर भागातील ३१ गुंठे परिसरात मूकबधीर विद्यालय बांधले जाणार आहे. या ठिकाणी उद्यान, क्रीडांगण असून, एक मजली इमारत बांधण्यात येणार आहे. यामध्ये आठ वर्ग खोल्या, मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र निवासस्थान, विद्यालयातील अधीक्षकांसाठी कार्यालय व निवासस्थान, श्रवण चाचणी खोली, वैद्यकीय कक्ष, अंतर्गत खेळाची खोली व सुसज्ज असे सभागृह असणार आहे. त्यामुळे ही कामे कधी पूर्ण होणार, असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे. या इमारतीचे काम पूर्ण होत नसल्याने दर महिन्याला २० हजारांहून अधिक रुपये भाड्याच्या शाळेसाठी खर्च करावे लागत आहेत.

> मूकबधीर विद्यालयाच्या इमारतीच्या कामाला गेल्या काही महिन्यांपासून गती आली आहे. दुसरा स्लॅब पडला आहे. गेली काही दिवस वरसोलीची यात्रा सुरु होती. त्यामुळे काम बंद होते. आता पुन्हा नव्याने काम सूचना केली आहे. तीन महिन्यांत हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.
>
> – राहुल देवांग, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग

# जिल्ह्यात महामानवाला अभिवादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या वतीने महामानवाच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील काही गावांमध्ये मध्यरात्री मेणबत्ती प्रज्वलित करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. काही ठिकाणी सकाळी बुद्ध विहारांमध्ये तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्हार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बुद्धवंदना घेण्यात आली. अलिबागमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख तथा माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अलिबाग नगरपरिषदेचे गटनेते प्रदीप नाईक, माजी नगरसेवक अनिल चोपडा, वृषाली ठोसर तसेच भारतीय बौध्द महासभा आणि बौद्धजन पंचायत समितीचे आजी-माजी पदाधिकारी, महिला व अनुयायी उपस्थित होते. दरम्यान, अलिबाग नगरपरिषदेच्या कार्यालयातही महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

### हजारो अनुयायी चैत्यभूमीकडे

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीमध्ये राज्यासह देशभरातील लाखो अनुयायी दाखल झाले. रायगड जिल्ह्यातील दहा हजारांहून अधिक अनुयायी चैत्यभूमीवर गेले. काही अनुयायी शुक्रवारी सकाळी तर काही अनुयायी दोन दिवस अगोदरच दादरला दाखल झाले होते.

## मधुकर पिचड यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मधुकर पिचड यांचं निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मधुकर पिचड यांना ऑक्टोबरमध्ये ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना नाशिकमधील नाईन पल्स रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. तेव्हापासून मधुकर पिचड यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, शुक्रवार (दि.६) वयाच्या ८४ व्या वर्षी मधुकर पिचड यांनी अखेरचा श्वास घेतला.



मधुकर पिचड यांच्या निधनामुळे अकोले तालुक्यावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मधुकर पिचड हे राज्याचे माजी मंत्री होते. अहिल्यानगर (अहमदनगर) अकोले विधानसभा मतदारसंघातून १९८० ते २००४ या काळात मधुकर पिचड हे तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तसेच मधुकर पिचड यांनी अनेक महत्त्वाची पदे भुषवली आहेत. तसेच आदिवासी विकास, वन व पर्यावरण मंत्री म्हणूनदेखील कार्यभार त्यांनी पाहिला होता.

अकोले तालुक्यामधील विकासात मधुकर पिचड यांचं महत्त्वाचं योगदान मानलं जातं. दरम्यान, २०१९ मध्ये मधुकर पिचड यांनी राष्ट्रवादीमधून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता.

## शेतकऱ्यांवर मोदी सरकारची दंडेलशाही

### पोलिसांनी फोडल्या अश्रुधुरांच्या नळकांड्या

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हरियाणाच्या अंबालाजवळील शंभू सीमेवर सुमारे नऊ महिन्यांपासून आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी शुक्रवारी (दि.६) दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेतकऱ्यांनी बॅरिकेट्स तोडले. यादरम्यान शेतकऱ्यांना पांगवण्यासाठी हरियाणा पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. या दरम्यान एक शेतकरी जखमी झाला. त्याला रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. तर एका शेतकऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी हरियाणा पोलिसांनी रस्त्यात लोखंडी खिळे लावले आहेत. यावेळी शेतकऱ्यांनी पोलिसांच्या कारवाईचा निषेध करत घोषणा दिल्या.




हरियाणाकडून शेतकऱ्यांना सांगण्यात आले आहे की, तुमचे शिष्टमंडळ पाठवा, आम्ही चर्चा करू. तोपर्यंत शेतकऱ्यांना पुढे जाऊ दिले जाणार नाही. पण शेतकरी दिल्लीच्या दिशेने कूच करण्यावर ठाम आहेत. .सर्व पिकांना किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी द्यावी, यासह अन्य मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांनी १३ फेब्रुवारी आणि २१ फेब्रुवारी रोजी दिल्लीच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केला होता. पण, त्यांना पंजाब-हरियाणा सीमेवरील शंभू आणि पान २ वर

## व्याजदर पुन्हा जैसे थे!

### सलग ११व्यांदा आरबीआयच्या पतधोरणात बदल नाही

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गेल्या दहा पतधोरण समिती बैठकांमध्ये रिझर्व्ह बँकेनं घेतलेली भूमिका आता ११व्या समिती बैठकीतही कायम ठेवली आहे. अर्थात, सलग अकराव्यांदा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं पतधोरण ६.५ टक्के म्हणजेच जैसे थेच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी यासंदर्भात माध्यमांना माहिती दिली. देशात महागाईचे वाढलेले दर आणि आर्थिक विकास दरामध्ये दिसणारी घट या पार्श्वभूमीवर आरबीआयनं व्याजदर जैसे थेच ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे बाजारात चर्चेला सुरुवात झाली आहे.



दरम्यान, एकीकडे आरबीआयने व्याजदर जैसे थे ठेवले, असताना दुसरीकडे देशाचा अंदाजित विकासदरदेखील खाली आणला आहे. याआधी ७.२ टक्के दराने आर्थिक विकास साध्य होईल, असा अंदाज रिझर्व्ह बँकेनं वर्तवला होता. पण आता तो कमी करून ६.६ टक्के असा ठेवण्यात आला आहे. यावर्षी जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर गेल्या सात तिमाहींमध्ये सर्वात कमी म्हणजेच पान २ वर

## खारघरमध्ये तीन बांगलादेशी जेरबंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने खारघर, सेक्टर- २१ मधील तपोवन सोसायटीतील घरावर छापा मारुन दोन महिला आणि एक पुरुष अशा तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे.

पोलिसांनी चौथ्या बांगलादेशी नागरिकाचा शोध सुरु केला असून, सदर चारही बांगलादेशी नागरिक मागील दहा वर्षांपासून भारतात बेकायदेशीररित्या वास्तव्यास असल्याचे तसेच त्यातील एका जोडप्याने आधारकार्ड, पॅनकार्ड तसेच निवडणूक ओळखपत्र बनवून घेतल्याचे उघडकीस आहे. खारघर, सेक्टर-२१ मधील तपोवन सोसायटीत काही बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्य करत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक फृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सरिता गुडे आणि त्यांच्या पथकाने तपोवन सोसायटीतील संशयित घरावर छापा मारला. यावेळी सदर घरामध्ये शकीला कादिर शेख (३७), तिचा पती कादिर हबीबुल शेख (४०) याच्या सोबत राहत असल्याचे तसेच रुकसाना अमिरुल घरामी (३४) आणि तिचा पती अमिरुल दिनो घरामी (३४) पान २ वर

### उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण घरकुलामुळे माणगाव तालुका राज्यात अग्रेसर

# घरकुलांमुळे उघडली स्वप्नांची दारे

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका घरकुल योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यात अग्रेसर ठरत आहे. राज्य शासनाने प्रधानमंत्री जनमन आवास योजना व रामाई घरकुल योजना यांसारख्या योजनांद्वारे गोरगरिबांना निवारा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. तालुक्यात ७४ ग्रामपंचायती असून, घरकुलासाठी २०५३ लाभार्थांचा सर्व्हे करण्यात आला. त्यापैकी १९१८ पात्र लाभार्थी ठरविण्यात आले. तर १३५ ऑनलाईन अपात्र लाभार्थी ठरविण्यात आले. यामधून १३७९ घरकुलाला मंजुरी देण्यात आली. पैकी ३२९ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. उर्वरित १०५० घरकुले प्रगती पथावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातच नव्हे तर, राज्यात माणगाव तालुका घरकुल योजनेत अग्रेसर ठरला असून, या घरकुलांमुळे अनेकांच्या स्वप्नांची दारे उघडली आहेत.





माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार यांनी लोकसहभाग आणि स्थानिक रोजगाराच्या पलीकडे जाऊन ‘आपलं घर, सुंदर घर’ ही संकल्पना या तालुक्यात राबवत घरकुल योजना केवळ निवाऱ्याचे साधन नाही, पान २ वर

### जिल्हानिहाय बांधलेली घरे

रायगड ७०६, पालघर ६५०, यवतमाळ २४५, नांदेड १२८, नाशिक ९६, गडचिरोली ८३, रत्नागिरी ६५, ठाणे ४८, सातारा २१, अमरावती २०, पुणे ११, वर्धा ११, चंद्रपूर १०, अहमदनगर ३, सिंधुदुर्ग ०, कोल्हापूर ०.

### रायगड जिल्ह्यातील घरकुले

जिल्ह्यात एकूण ७०६ घरकुले बांधून पूर्ण झाली. त्यांपैकी माणगाव ३२९, सुधागड ६२, मुरुड ४८, तळा ४५, कर्जत ४३, अलिबाग ३१, पनवेल ३१, पेण २२, रोहा २१, महाड २१, पोलादपूर १९, श्रीवर्धन १३, उरण ११ म्हसळा ७, खालापूर ३ घरकुलांचा समावेश आहे.

> शासनाची प्रधानमंत्री जनमन आवास योजना ही आदिवासी वंचित गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून कमी वेळात लाभार्थांना लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात सकारात्मक दृष्टीकोनातून काम चालू आहे. त्यामुळे लाभार्थांना निवाऱ्याची सोय झाली आहे. माणगाव पं. स. गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी उत्तम नियोजन करून ही योजना प्रभावी राबविली. या योजनेमुळे आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीत होईल
>
> – प्रियदर्शनी मोरे, प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा रायगड

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# पालिका हद्दीत ८० इमारती अतिधोकादायक

## पालिकेमार्फत नोटीस बजावूनही पाणी, वीजपुरवठा कायम

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

**पालिकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पालिका हद्दीत जवळपास ८० रहिवासी इमारती राहण्यासाठी अतिधोकादायक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. असे असतानाही अतिधोकादायक ठरवण्यात आलेल्या या इमारतीमध्ये रहिवासी अद्यापही वास्तव्य करत आहेत. अतिधोकादायक ठरवण्यात आलेल्या अशा इमारतींचा पाणी आणि वीजपुरवठा खंडित करण्यात यावा यासाठी पालिकेमार्फत महावितरण आणि पाणीपुरवठा विभाग यांना पाठवण्यात आलेल्या पत्रानंतरदेखील तो सुरु ठेवण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे.**

### प्रभागात सर्वाधिक अतिधोकादायक इमारती

पालिकेमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ड प्रभागात सर्वाधिक ४८ इमारती अतिधोकादायक स्वरूपात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्या खालोखाल अ प्रभागात १३, ब प्रभागात १० तर क प्रभागात ९ इमारती राहण्यासाठी अतिधोकादायक आहेत.

### अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतीची कॅटेगरी

राहण्यासाठी अतिधोकादायक ठरविण्यात आलेल्या इमारतींना पालिकेमार्फत सी १ हा दर्जा दिला जातो, तर राहण्यासाठी धोकादायक पण दुरुस्ती करण्यात आल्यानंतर राहण्यासाठी योग्य इमारतींना सी २ बी हा दर्जा दिला जातो.

> राहण्यासाठी अतिधोकादायक ठरवण्यात आलेल्या रहिवासी इमारतींचा पाणी आणि वीजपुरवठा खंडित करण्यात यावा यासाठी पालिकेमार्फत संबंधित विभागासोबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
>
> – मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल पालिका

नागरिकांना राहण्यासाठी धोकादायक झालेल्या इमारतीचे सर्वेक्षण पालिकेमार्फत दरवर्षी करण्यात येत असते. या सर्वेक्षणातून राहण्यासाठी अतिधोकादायक झालेल्या इमारती खाली करून तेथे वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन करण्याचे काम पालिकेमार्फत केले जाते. पनवेल पालिकेमार्फतदेखील पालिका हद्दीतील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. पालिकेच्या चारही प्रभागांत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणानुसार पालिका हद्दीत तब्बल ८० रहिवासी संस्थांमधील इमारती रहिवाशांच्या राहण्यायोग्य नसल्याची माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. मात्र, असे करताना अतिधोकादायक ठरवण्यात आलेल्या या इमारतींमधील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी पालिका प्रशासन काय उपाययोजना करणार याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

## ग.जो. भगत गुरुजींना देवाज्ञा



**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील मोठे शहापूर येथील गजानन जोमा भगत यांचे मंगळवारी (दि. ३) राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, एक नातू, एक नात असा परिवार आहे. रुची राजन भगत ही त्यांची नात रायगड जिल्ह्यातील पहिली न्यायाधीश होय.


गजानन जोमा भगत पेशाने शिक्षक होते. त्यांनी तुरमाळे (पनवेल) पहिली सेवा बजावली. तद्नंतर ट्रेनिंग कोलेज पनवेल येथे ज्यु.पी.टी.सी. प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर ओलमन (कर्जत), तीसे-तळवली (रोहा), वडवली (श्रीवर्धन) येथे नोकरी करताना हनुमान व्यायामशाळा सुरु केली. त्या व्यायामशाळा आजदेखील सुरू आहेत. त्यांनी धेरंड, मानकुळे, पारनखार येथे सेवा बजावली. याचबरोबर ते मल्लखांब व योग शिक्षण देत असत. त्यांचे काही विद्यार्थी परदेशात योग व मल्लखांबाचे प्रशिक्षण देत आहेत. शंकरराव चव्हाण डोल्व्हाल बंधाऱ्याच्या उद्घाटनासाठी कोलाड येथे आले असताना त्यांनी चालत्या बैलगाडीत मल्लखांब लावून चित्तथरारक प्रात्यक्षिक केले होते. त्यांचे १०० हून जास्त विद्यार्थी केवळ मैदानी खेळाच्या जोरावर सरकारी सेवेत लागून निवृत्तदेखील झाले आहेत. मोठे शहापूर येथे पहिल्या पायी आळंदी दिंडीचे प्रवर्तक होते. त्याचबरोबर पंढरपूर येथील आषाढीला व कार्तिकी दिंडीतदेखील ते सतत ३० वर्षांहून अधिक काळ सहभागी होते. त्यांना निवृत्त शिक्षक तसेच ज्येष्ठ नागरिक संघटना यांच्या वतीने सुधीर पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली. सिद्धिविनायक क्रीडा मंडळाच्या वतीने सुधीर थळे तर वारकरी सांप्रदायातर्फे निळकर महाराज, अमरनाथ भगत, सतीश भगत, तीसे येथील हरी बिर्गावले यांनी श्रद्धांजली वाहिली.

## चंद्रकांत माने यांचे निधन



**चिरनेर :** न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गोपनीय शाखेत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले चंद्रकांत रावण माने (५४) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले आहे. चंद्रकांत माने हे नवी मुंबई पोलीस दलात उरण, तुर्भे, नेरूळ, नवी मुंबई, विशेष शाखा तर सध्या ते न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गोपनीय शाखेत कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर धाराशिवमधील धुत्ता या गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## दिपक साबळे यांचे देहावसान



**माणगाव :** माणगाव येथील लोकनेते तथा माजी आ. स्व. अशोकदादा साबळे यांचे धाकटे बंधू दिपक गणपत साबळे यांचे दीर्घ आजाराने गुरुवार, दि.५ डिसेंबर रोजी सकाळी ५.३० वाजता माणगाव येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ, बहिणी, मुलगे, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने साबळे, यादव कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार व माणगावकरांवर शोककळा पसरली आहे. कै. दिपक साबळे यांचा दशक्रिया विधी शनिवार, दि.१४ डिसेंबर रोजी हरिहरेश्वर येथे, तर उत्तर कार्यविधी मंगळवार, दि.१७ डिसेंबर रोजी राहत्या घरी खांदाड-माणगाव येथे होणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.

# द्रोणागिरी येथे आरोग्य सेवा केंद्र सुरू करा

## शेकाप नेते प्रीतम म्हात्रेंची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यात जेएनपीटी, दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ अशाप्रकारे मोठे उद्योग येत आहेत. तेथे येणाऱ्या रोजगारासाठीसुद्धा भारतातून वेगवेगळ्या ठिकाणाहून अनेक नागरिक या ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. सिडकोच्या माध्यमातून पुष्पकनोड, उलवे, द्रोणागिरी येथे मोठ्या प्रमाणात शहराची निर्मिती करण्यात आली. सिडकोने या ठिकाणी रस्ते, पाणी, वीज अशाप्रकारे सुविधा दिल्या आहेत; परंतु तेथील वाढती लोकसंख्या पाहता आजही त्या अपुऱ्या आहेत. याठिकाणी आरोग्य सेवा केंद्र सुरु करावे, अशी मागणी शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांनी केली आहे.



ते म्हणाले की, आरोग्याच्या बाबतीत विचार केला असता ५०,००० पेक्षा जास्त नागरिक आज द्रोणागिरी नोड मध्ये भारतातील विविध क्षेत्रातून नोकरी निमित्त येथे येऊन रहात आहेत. या ठिकाणी राहणारे नागरिक हे सिडकोच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरोग्य सेवेच्या बाबतीत आजही वंचित आहेत. या ठिकाणी आरोग्य सेवेसाठी आरक्षित असलेल्या ठिकाणी सिडकोच्या माध्यमातून आरोग्य सेवा केंद्र सुरू करावे जेणेकरून शासनाच्या सर्व आरोग्य सेवा आणि सुविधा तेथील नागरिकांना मिळतील.

> शहरीकरण करताना सिडकोने शहरे वसवली, परंतु अजूनही येथील नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अपुऱ्या आहेत. द्रोणागिरी येथे आरोग्य सेवेबाबतीत अजूनही उपायोजना नाही. द्रोणागिरीत होणारे आरोग्य केंद्र हे सिडकोच्याच माध्यमातून सुरू करण्यात यावे जेणेकरून तेथील नागरिक जो कर सिडकोला देतात त्या मोबदल्यात त्यांना सेवा सुविधा मिळतील.
>
> – प्रीतम म्हात्रे, शेकाप नेते

## रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांची लगबग



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यात भात कापणीनंतर वाल पिकाची पेरणी केली जाते. वाल पेरणीसाठी पूर्वमशागतीच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी शेतकरी स्व:कडील स्थानिक जातीच्या वालाचा वापर करीत आहेत. त्यावबरोबर कलिंगडाचे मोठ्या प्रमाणावर पीक घेतले जाते. यासाठी अळी करणे, सरी वरंबा करणे इत्यादी पूर्वमशागतीची कामे सुरू आहेत.

वालाची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने शिवाय आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या व्यवसायावर होत असल्याने शेतकऱ्यांकडून जोडधंदा म्हणून शेतात पीक घेतले जाते. चार महिने हिवाळ्याचे असल्याने व थंडीत दवामुळे जमीन ओली होत असल्याने पिकाला त्याचा उपयोग होतो. या पिकांना पाण्याची आवश्कता नसते. या थंडीच्या दवामुळे जमीन ओलसर होते. त्यामुळे वाल पीक, कलिंगड चांगले येते. त्यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळले. मुरुड तालुक्यातील तेलवडे, शिघ्रे, आदाड, खारअंबोली, काकळघर, बोर्ली, मांडला, वाणदे, जोसराजण, वावडुंगी आदी गावांतून या पिकांची मोठी लागवड केली जाते.

## पिसरनाथ महाराजांचा भंडारा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी येणारे पर्यटक यांचे हक्काचे ठिकाण म्हणून शारलोट लेक परिसरातील पिसरनाथ महाराज यांचे मंदिर प्रसिद्ध आहे. पिसरनाथ हे माथेरानकरांचे ग्रामदैवत असून, त्यांचा वार्षिक भंडारा मंगळवारी (दि. ३) संपन्न झाला. माथेरान मधील हजारो भक्तांनी मंदिरात येवून सेवा करीत भक्तांना महाप्रसादाचे वितरण केले.



माथेरान श्री पिसरनाथ उत्सव भंडारा समिती कडून दरवर्षी श्री पिसरनाथ महाराज यांचा भंडारा आयोजित केला जातो.डिसेंबर महिन्यातील पहिल्या मंगळवारी हा सोहळा उत्सव समितीच्या वतीने आयोजित केला जातो.या सोहळ्याचे निमित्ताने श्री पिसरनाथ महाराज यांच्या मंदिरात अभिषेक,होम हवन,यज्ञ यांचे आयोजन केले जाते. त्यावेळी पूजेसाठी संदीप शेलार, वजनी चौधरी, अनिल बोराडे, अंकुश शेळके, उत्तम सोनावणे आदी दाम्पत्य सहभागी झाले होते. तर पुणे येथील भावे गुरुजी आणि त्यांचे सहकारी हे गेली १५ वर्षे या भंडारा सोहळ्याचे पौरहित करीत असतात.यावर्षी स्थानिक मुकेश तोरणे यांनी त्या कार्यात सहभाग घेतला. पिसरनाथ महाराज यांच्या भंडारा सोहळ्याला माथेरान शहरातील सर्व नागरिक तसेच माथेरानच्या माहेरवाशीण आणि मुली या बाहेरगावावरून माथेरानमध्ये येत असतात.

श्री पिसरनाथ महाराज भंडारा सोहळ्याचे आयोजन करण्यात अजय सावंत, विवेक चौधरी, कुलदीप जाधव, गिरीश पवार, प्रसाद सावंत, किरण चौधरी, प्रवीण सकपाळ, आकाश चोधरी, मंगेश सकपाळ, विकास पर्टे, चंद्रकांत शेट्टे यांचा प्रमुख सहभाग होता. त्याशिवाय माथेरान नगरपरिषद याचा सहभाग राहिला. या सोहळ्याचे निमित्ताने माथेरान शहरात सर्वत्र श्री पिसरनाथ महाराज भंडारा साठी आलेली भक्तांची गर्दी सर्व भागात दिसून येत होती.तर माथेरान मधील पर्यावरण पूरक ई-रिक्षा या भक्तांना प्रवास करण्यात मदतीला होत्या.

## राज भिलारे, यश सितापरावची सैन्य दलात निवड

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील कळंबोशी येथील संतोष यदु भिलारे यांचे सुपुत्र राज संतोष भिलारे आणि झाप येथील महेंद्र सितापराव यांचे सुपुत्र यश सितापराव या दोघांनी इंडियन आर्मी मराठा रेजिमेंट ट्रेनिंग पूर्ण करून भारतीय भूमीची सेवा करण्यासाठी भारतीय सैन्य दलात दाखल झाले आहेत. त्यांच्या या देदीप्यमान आणि गौरवास्पद कामगिरीचे सर्व सुधागडवासियांकडून कौतुक करण्यात येत आहे. हे दोन्ही तरुण भारतीय सैन्य दलात दाखल झाल्यामुळे सुधागडवासियांच्यावतीने अभिमानास्पद भव्य मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्यात येणार आहे.



## सर्पमित्राने दिले सापाला जीवदान



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथून भारतीय अजगर फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर उरणचे उपाध्यक्ष राजेश पाटील व स्वयंसेवक मोहन पाटील यांनी सापाला पकडून मंगळवारी (दि. ३) चिरनेर वनपरिक्षेत्रात त्यास मुक्त केले. सर्पमित्र राजेश पाटील व मोहन पाटील ह्यांनी तो साप स्लेंडर कोरल सर्प असल्याचे सांगितले. स्लेंडर कोरल हा साप भारतात सर्वत्र आढळणारा आकाराने सर्वात छोटा विषारी साप असून, दुर्मिळ साप आहे. त्यावेळेस फॉन संस्थेचे सदस्य विवेक हुदली व निकेतन ठाकूर आदी उपस्थित होते.

## दिव्यांग जन्माला येऊ नये, याची खबरदारी घ्यावी : ठोंबरे

**। रसायनी । वार्ताहर ।**

दिव्यांग जन्माला येऊ नये, यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असून, आपण सर्वांनी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे आवाहन ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी केले आहे.



ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला त्यावेळी सरपंच रितू ठोंबरे बोलत होत्या. जागतिक दिव्यांग व्यक्ती दिन दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. हा दिवस दिव्यांग व्यक्तींवरील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. १९९२ साली संयुक्त राष्ट्र संघाने या दिवसाची सुरुवात केली होती. या दिवसाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांची आणि गरजांची पूर्तता करण्यासाठी समाजात जागरुकता निर्माण करणे आहे. आजच्या दिवशी विविध प्रकारच्या दिव्यांगतेच्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये दिव्यांग व्यक्तींचे योगदान आणि सामर्थ्य प्रदर्शित करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो. दिव्यांग व्यक्तींना शारीरिक किंवा मानसिक अडचणी येत असतात, परंतु त्यांच्यात अपार क्षमता, गुण, आणि कार्यक्षमतादेखील असतात. समाजाने या व्यक्तींना समान संधी आणि समर्थन देणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोलार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी उपसरपंच सुभाष पवार, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## अनंता खैरेंची केंद्रप्रमुखपदी नियुक्ती

**। पाली । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील शेळू केंद्राचे केंद्रप्रमुखपदी अनंता खैरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे संपूर्ण सुधागड तालुका व नांदगाव परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



अनंता खैरे यांनी राजिप प्राथमिक शाळा नागशेत येथे प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेस सुरुवात केली. त्यांना कर्जत तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अनेक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. सद्यःस्थितीत ते महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती संघटक, सुधागड तालुका मराठा समाजाचे शिक्षण समिती प्रमुख म्हणून यशस्वीपणे कार्य पाहात आहेत.

## एड्स आजही धोकादायक : लोंढे



**। रसायनी । वार्ताहर ।**

एड्स हा आजही धोकादायक आहे, उपचार आहेत, पण योग्य वेळी उपचार घेणे आणि हे उपचार दीर्घकालीन ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे, असा सल्ला समुपदेशक अशोक लोंढे यांनी दिला.

आई बाबा फाऊंडेशन व ग्रामीण रुग्णालय चौक आय. सी.टी.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक एड्स डे चौक येथील आई बाबा फाऊंडेशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी समुपदेशक अशोक लोंढे बोलत होते. अशोक लोंढे यांनी एचआयव्ही एड्सची प्रमुख लक्षणे, त्याची कारणे, टी.बी. आजाराची लक्षणे, सोबत उपचार पद्धती आणि आपण यापासून कशी सावधानता बाळगावी यासंदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी आई बाबा फाऊंडेशनमधील ११० पेक्षा जास्त जण उपस्थित होते. यावेळी उपस्थित लोकांसोबत एचआयव्हीविषयी शंका निरसन संभाषण चर्चा झाली. केअर टेकर महेश वाडेकर, लॅब टेक्निशियन विकास घुमरे, आई बाबा संस्थापक प्रवीण नवरे उपस्थित होते.

पान १ वरून

## उरणचे शेवंड, खेकडे सातासमुद्रापार

कमी झाली आहे. परिणामी, या दोन्ही माशांचे दर वाढले आहेत. गेल्या काही वर्षांपासून शेवंडी किलोला १२०० ते १७०० रुपये असलेला दर १९०० ते २ हजार रुपयांवर पोहोचला आहे.

## व्याजदर पुन्हा जैसे थे!

५.४ टक्क यांपर्यंत खाली घसरल्याचं पाहायला मिळालं होतं.याशिवाय रिझर्व्ह बँकेनं कॅश रिझर्व्ह रेश्यो अर्थात सीआरआरदेखील ४.५ टक्क्यांवरून ४ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय, बँकांना १.१६ कोटींची गंगाजळी उपलब्ध करून दिली जाईल, असंही गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी नमूद केलं. सीआरआर म्हणजे रिझर्व्ह बँकेकडून महागाई दर आटोक्यात आणण्यासाठी राखून ठेवण्यात येणारा प्रत्यक्ष निधी. त्यामुळे हा निधी रिझर्व्ह बँकेकडे कमी होणार असून, बाजारात जास्त प्रमाणात बँकांना उपलब्ध होणार आहे.

## शेतकऱ्यांवर मोदी सरकारची दंडेलशाही

खनौरी येथे सुरक्षा दलांनी रोखले होते. शेतकरी गेल्या नऊ महिन्यांपासून संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजदूर मोर्चाच्या बॅनरखाली शंभू आणि खनौरी सीमेवर तळ ठोकून आहेत. शेतकरी नेते सुरजित सिंग फूल, सतनाम सिंग पन्नू, सविंदर सिंग चौटाला, बलजिंदर सिंग चडियाला आणि मनजीत सिंग यांच्या नेतृत्वाखाली १०१ शेतकऱ्यांच्या गटाने दुपारी १ वाजता दिल्लीच्या दिशेने मोर्चाला सुरुवात केली. शेतकरी नेते सर्वनसिंग पंधेर हे आंदोलनस्थळी उपस्थित आहेत. दिल्लीच्या दिशेने कूच करणाऱ्या १०१ शेतकऱ्यांमध्ये त्यांचा सहभाग नव्हता.

राष्ट्रध्वज आणि त्यांच्या शेतकरी संघटनांचे झेंडे फडकावत शेतकऱ्यांनी बॅरिकेट्स एक थर तोडला. पण कॉंक्रीट ब्लॉक्स, लोखंडी खिळे आणि तारांचा अडथळा आणि कडक बंदोबस्तामुळे त्यांना पुढे जाण्यापासून रोखण्यात आले. शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अंबालामध्ये ९ डिसेंबरपर्यंत इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. रस्त्यावर बॅरिकेडिंग करण्यात आले असून, अंबाला प्रशासनाने पाच अथवा त्याहून अधिक लोकांना एकत्र जमण्यास बंदी घातली आहे.

## घरकुलांमुळे उघडली स्वप्नांची दारे

तर ती तालुक्यातील लोकांना रोजगार देणारी संधीही ठरली आहे. माणगाव तालुक्यातील घरकुल योजनेमध्ये ठेकेदारामार्फत न बांधता, संबंधित लाभार्थ्यांनी स्वतःचं घर स्वतःच बांधायचं असा कानमंत्र देत ही घरे सहभागातून उभी केली. लाभार्थ्यांना बांधकाम साहित्य खरेदीत येणाऱ्या अडचणी कौशल्याने सोडवत, त्यांना बांधकाम साहित्य वेळोवेळी पुरविण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. आज माणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये हजारो गरजू कुटुंबे कच्च्या घरांमध्ये राहतात. पावसाळ्यात गळणारी झोपडी, उन्हाळ्यात तापणारी कौलारू टिनाची छपरे किंवा वादळात उडणाऱ्या झोपड्यांपासून मुक्तता झाल्याने त्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी माणगाव पंचायत समितीने टाकलेलं हे एक सकारात्मक पाऊल आहे. या घरांमुळे मुलांच्या शिक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे.

माणगाव तालुका आता घरकुल योजनांच्या माध्यमातून राज्यासह अन्य तालुक्यांसाठी आदर्श ठरत आहे. या योजनेमुळे केवळ माणगाव नव्हे, तर संपूर्ण राज्याचा विकास साधता येईल, अशी स्थानिक लोकांची भावना आहे. माणगाव तालुक्यातील घरकुल योजनांची ही यशस्वी वाटचाल माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. जठार यांनी केलेले योग्य नियोजन तसेच ग्रामपंचायत मधील सर्व ग्रामविकास अधिकारी, विस्ताराधिकारी, कर्मचारी यांना विश्वासात घेऊन शासकीय वेळे व्यतिरिक्त सुट्टीच्या दिवशीही लोकसेवकांची जबाबदारीचे धडे त्यांच्यात रुजवत लाभार्थी ग्रामस्थांच्या लोकसभागातून आणि प्रशासनाचा पारदर्शक दृष्टिकोन यामुळे अनेकांच्या स्वप्नातली घरे पूर्ण झाली त्याचा आनंद आजही लाभार्थी कुटुंबाच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.

## खारघरमध्ये तीन बांगलादेशी जेरबंद

असे दोघे खारघर, सेक्टर-१३ मधील एका बिल्डींगमध्ये राहात असल्याचे आढळून आले. त्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सदर तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कागदपत्रांबाबत चौकशी केली असता, त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र नसल्याचे आढळून आले. मात्र, त्यातील शकीला कादिर शेख आणि तिचा पती कादिर हबीबुल शेख या दोघांकडे आधारकार्ड, पॅनकार्ड आणि निवडणूक ओळखपत्र असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सदर आधारकार्ड, पॅनकार्ड आणि निवडणूक ओळखपत्र जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले.

## दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू

राकेश राजभर (२१), मंजित चव्हाण (२०), जितेंद्र (३७), राम समूज (४३), प्रेम सागर (२२) अशी त्यांची नावे आहेत. त्या कामगारांना तात्काळ बाहेर काढून खोपोली येथील डॉ. जाखोटीया हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, रात्री दोन कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे, तर चार कामगारांवर उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती वावोशी पोलिसांना मिळताच तात्काळ वावोशी पोलीस, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठीची संस्था आणि इतर यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल होत जेसीबीच्या सहाय्याने शोधमोहीम चालू केली. मात्र, ढिगाऱ्याची माती उकरून अधिक केला असता त्या खाली उपचारार्थ दाखल केलेले सहाच कामगार असल्याचे निष्पन्न झाले.

निवडक

## कॅन्डल मार्च आयोजन

**पनवेल :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यासाठी प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक से.३ करंजाडे ते डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक पनवेल येथे कॅन्डल मार्च काढून अभिवादन करण्यात आले.यावेळी आयु. कुणाल लोंढे प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी धम्मबांधव धम्मभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंबोलीतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमध्ये राहणारा एक २८ वर्षीय तरुण मिटींगला जातो असे घरात सांगून कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रेम राजेश गुप्ता रंग गोरा, केस काळे बारिक, नाक सरळ, चेहरा उभट, उंची ५ फुट ७ इंच असून, अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्याचा गोल गळ्याचा टी-शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, उजव्या हाताच्या मनगटावर त्रिशुल गोंदलेले व ऑपरेशन झाल्याची खुण आहे.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** शिरढोण येथील सेफ एक्स्प्रेस कंपनीतून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राजा संजय सिंग असे या इसमाचे नाव असून, रंग गोरा, उंची ५ फुट ७ इंच, बांधा मजबूत, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे असून, अंगात हाफ ब्राऊन रंगाचा टी-शर्ट व हाफ पॅन्ट तसेच पायात काहीही नाही. तो मैथिली भाषा बोलता येते.

## लुटण्याच्या बहाण्याने मारहाण

**पनवेल :** पैसे लुटण्याच्या बहाण्याने एका इसमास मारहाण केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. मोहम्मद अल्ताफ मो.समशेर शेख याच्याकडे भंगार गोळा करणारे आशिष सिंग व त्याच्या मित्र असे माया बारच्या समोरील रोडवर असताना आरोपी बाबू वाघमारे व त्याच्या इतर मित्रांनी आपसात संगनमत करून पैसे लुटण्याच्या उद्देशाने या दोघांना अडवून त्यांना मारहाण करून जखमी केले. तसेच कोणत्या तरी हत्याराने आशिष यास मारहाण केली.

## ५८ लाखाचा घातला गंडा

**पनवेल :** पनवेल परिसरात राहणाऱ्या एका वृद्ध इसमाला ऑनलाईन ट्रेडींगचा मोह आवरता आला नाही व ५८ लाखाचा गंडा बसला असल्याची घटना घडली आहे. इसमाला गेल्या काही महिन्यापासून व्हॉटसअॅपवर शेअर मार्केटबाबत मेसेज आला. त्यांना साडेपाच कोटी रुपयाचा नफा झाल्याचेही भासविले. त्यांना संशय आला व आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार केली असून ५ अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 172 कोटींची पाणीपट्टी थकली

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**करदात्याकडून ग्रामपंचायती सक्तीने पाणीपट्टी वसूल करतात; परंतु ही पाणीपट्टी खरोखरच संबंधित प्राधिकरणाला दिली जाते का, असा प्रश्न अलिबाग तालुक्यात निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतींकडून १७२ कोटी २९ लाखांचे बिले थकीत आहेत. लवकरात लवकर बिले अदा न केल्यास गावांचा पाणीपुरवठा बंद करण्याची वेळ एमआयडीसीवर येण्याची शक्यता आहे.**

अलिबाग नगर परिषद, पायलट योजनेअंतर्गत जिल्हा परिषद अखत्यारित पंचायत समिती, रेवस ग्रामीण पुरवठा १ आणि जलपाडा २, चेंढरे गाव यांसह ४० ग्रामपंचायतींतील लाखो नागरिकांना एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. करदाते नगर पालिका, ग्रामपंचायतीला नियमित पाणीपट्टी भरतात. ग्रामपंचायतींकडून ही पाणीपट्टी जिल्हा परिषदेकडे जमा केली जाते; परंतु ही पाणीपट्टी एमआयडीसीकडे नियमित भरणा होत नसल्याने ३० वर्षांपासून थकीत पाणीपट्टी वाढतच गेली. १७२ कोटींपैकी ४० कोटींची रक्कम थकबाकीवरील विलंब शुल्क आहे.

थकीत पाणीपट्टी भरण्यासाठी जिल्हा परिषदेकडे दरवर्षी पत्रव्यवहार केला जातो. ही रक्कम जिल्हा परिषदेच्या एकूण अर्थसंकल्पापेक्षा जास्त असल्याने जिल्हा परिषदेला एकरकमी भरता येत नाही. गतवर्षी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांच्याशी झालेल्या पाठपुराव्यानंतर दोन कोटींची एमआयडीसीला देण्यात आली, मात्र अजूनही मोठी रक्कम जिल्हा परिषदेकडे बाकी आहे.

एमआयडीसीद्वारे कंपन्यांना पाणी दिले जाते. कंपन्यांना पाणी देताना जलवाहिनीच्या मार्गात येणाऱ्या ग्रामपंचायत, नगर परिषद, पंचायत समित्यांनाही जोडणी देण्यात आली आहे. यात रोहा तालुक्यातील काही ग्रामपंचायती आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था या पाण्याचा वापर करतात, मात्र बिले भरण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे एमआयडीसीचा पाणीपुरवठ्यातील खर्चही निघत नाही. अनेकवेळा एमआयडीसीला जलवाहिनी दुरुस्तीही करता येत नाही. नवीन धरणे अद्याप तयार होत नाहीत. त्यामुळे एमआयडीसी किती दिवस मोफत पाणीपुरवठा करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### कोणाकडे किती थकबाकी?

| | |
|---|---|
| अलिबाग नगर परिषद | – २७ कोटी ९४ लाख |
| पायलट योजना | – ५२ कोटी ५९ लाख |
| जिल्हा परिषद अंतर्गत योजना | – १३ कोटी ८३ |
| ४० ग्रामपंचायतींकडे | – ७५ कोटी ६ लाख |
| नागोठणे एमआयडीसी | – २ कोटी ८४ लाख |
| एकूण | – १७२ कोटी २९ लाख . |

रायगड जिल्ह्यात जलजीवन योजनेअंतर्गत जुने किंवा नवे जलस्रोत तयार योजना राबवणे आवश्यक असताना पूर्णपणे एमआयडीसीच्या जलवाहिनीवरून योजना राबवली जात आहे. मार्चपासून जिल्ह्यात पाणीटंचाई जाणवू लागते. जलस्रोत कमी होत असल्याने टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. दिवसेंदिवस एमआयडीसीकडे पाणीपुरवठ्याची मागणी केली जात असली तरी पाणीपट्टी भरण्याकडे ग्रामपंचायतींचे दुर्लक्ष होत असल्याचे एमआयडीसीचे उपकार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी सांगितले.



१९८४ मध्ये अलिबागमध्ये आरसीएफ कंपनी सुरू होताना एमआयडीसीने अंबा नदीवरून शुद्ध पाणीपुरवठा करण्याची योजना सुरू केली. याच योजनेतून पुढे तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा सुरू झाला. त्यामुळे नैसर्गिक जलस्रोत बंद झाले, तर नवे जलस्रोत निर्माण करण्याकडे स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे नागरिक हे एमआयडीसीच्या पिण्याच्या पाण्यावरच अवलंबून राहिले आहेत.

> तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्च करून जलजीवन योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. या योजना तेथील जलस्त्रोतावर सुरू करणे आवश्यक असताना त्या एमआयडीच्या पाइपलाइनला जोडून सुरू करण्यात आल्या आहेत. मात्र, त्या सुरू करताना एमआयडीसीच्या थकीत पाणीपट्टीकडे दुर्लक्ष करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ही थकीत पाणीपट्टी भरण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. पाणीपट्टी जमा होत नसल्याने इतर योजनांवरही परिणाम होत आहे.
>
> – संजय नन्नावरे, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी अलिबाग.

## गाडीतील मौल्यवान वस्तू लांबविणाऱ्यास अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उभ्या गाडीला टकटक करून गाडीवरील चालकास जमिनीवर काहीतरी पडल्याचे सांगून सदर चालक गाडी बाहेर उतरले असताना संगनमताने गाडीतील मौल्यवान वस्तू पळविणाऱ्या टोळीतील एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

प्रशांत पिंगळे हे त्यांच्या गाडीतून मिटींगसाठी गार्डन हॉटेल परिसरात आले असताना त्यांच्या गाडीच्या पाठीमागील सिटवर रोख रक्कम असलेली बॅग ठेवली होती. गाडीवरील चालक गाडीतच बसला होता. दरम्यान आरोपी शनमुगम अमरनाथन व त्याच्या इतर तीन साथीदारांनी गाडी चालकाला खिडकीच्या काचेला टकटक करून जमिनीवर काहीतरी पडल्याचा इशारा केला असता सदर चालक हा गाडीबाहेर उतरुन गाडीच्या बाहेर पाहत असताना हे आरोपी गाडीतील ब्राऊन रंगाच्या बॅगेसह पसार झाले होते. याबाबतच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, अविनाश गंथडे, नितीन वाघमारे, अमोल डोईफोडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, विनोद देशमुख,चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने सदर आरोपी पैकी शनमुगम अमरनाथन याला ठाणे जिल्हा परिसरातून ताब्यात घेतले आहे.

## दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**। माथेरान । वार्ताहर ।**


माथेरानमध्ये आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. दिव्यांग दिनानिमित्त माथेरान नगर परिषदेतर्फे दिव्यांग बांधवांना आर्थिक सहाय्य वाटप कम्युनिटी सेंटर येथे सायंकाळी ०४-०० वाजता कार्यक्षम मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव, उद्योजक नितीन शहा, माथेरान लेखापाल अंकुश इचके, भारत पाटील, सदानंद इंगळे, अमूधन, ज्ञानेश्वर सदगीर तसेच नगरपरिषद कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोंढे धरणाची साठवण क्षमता वाढवणे काळाची गरज

- **पाणीपुरवठा वाढवण्यासाठी होणार सहाय्य**
- **वीज बिलाच्या खर्चाचीसुध्दा होणार बचत**

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

सुमारे तीस वर्षांनंतरही कोंढे धरणाच्या बंधाऱ्याचं बांधकाम सुस्थितीत आहे. या सर्व गोष्टींचा भविष्याच्या दृष्टीनं विचार करुन केंद्र शासनाच्या जलशक्ती अभियानांतर्गत या धरणावर पाणलोट क्षेत्र विकास योजना राबविण्यासाठी बोर्लीपंचतन ग्रामपंचायतीकडून संबधीत विभागाकडे तसा प्रस्ताव पाठवायला हवा. पावसाळ्यापुर्वी कोंढे पंचतन धरणातील गाळ, माती, दगड-गोटे काढण्याबरोबरच शक्य होत असेल तर पाणलोट क्षेत्राची रुंदी वाढवून धरणाची पाणी साठवण क्षमता वाढवता येईल का? याचा गांभीर्याने विचार होणं गरजेचं आहे.





१९९५ साली युती शासनाच्या कार्यकाळात झालेल्या या धरणाचं कार्यक्षेत्र अतिशय नैसर्गिक व पूर्णपणे माती, दगड गोट्यांच्या डोंगरातील आहे.धरणाचं पाणलोट क्षेत्र लहान असुन पावसाळ्यात धरणात पाणी जमा होताना पाण्याबरोबर माती, दगड, गोटे मोठ्या प्रमाणात वाहून येतात. त्याचा परिणाम पाणी साठ्यावर होत असून उभारणी केल्यापासून धरणातला गाळ काढला नसल्याने दरवर्षी पाणी साठवण क्षेत्र कमी होत आहे.

या धरणाच्या पाणलोट क्षेत्राची रुंदी वाढवून त्यातील गाळ, दगड, गोटे, माती काढल्यास पाण्याची साठवण क्षमता किती वाढवता येईल? आत्ताची साठवण क्षमता आणि पाणलोट क्षेत्राची रुंदी वाढविल्यानंतर वाढीव पाण्याचा दाब बंधारा पेलवू शकेल का? या तांत्रिक बार्बीची तपासणी करुन शक्य होत असेल तर बोर्लीपंचतन गावाची वाढती लोकसंख्या व वेगाने होणारा विस्तार पाहता पाणी साठवण क्षेत्राची रुंदी वाढविल्यास जादा जमा झालेल्या पाण्यामुळे आणखी दिड-दोन महिने तरी पाणी पुरवठा वाढणार आहे.

याचा सकारात्मक परिणाम लघु पाटबंधारे विभागाच्या कार्ले धरणावर होऊन तेथील थोडाफार पाणीसाठा राखीव राहून दिवसेंदिवस पावसाच्या कमी होत असलेल्या प्रमाणामुळे त्याचा वापर ऐनवेळी पाणीटंचाईच्या काळात होऊ शकतो. त्याचबरोबर बोर्लीपंचतन ग्रामपंचायतीच्या दोन तीन महिन्यांच्या वीज बिलाच्या खर्चाचीसुध्दा बचत होऊ शकते.



● मुरूड नवाबी राजवाड्यासमोरील डोंगराचे प्रतिबिंब समुद्राच्या साचलेल्या पाण्यात टिपले आहे. (छायाचित्र : सौरभ नाझरे)

## जागतिक दिव्यांग दिन साजरा

**पनवेल :** खारघर येथील राष्ट्रीय बौध्दीक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था प्रांगणात संस्था प्रमुख डॉ. बी. वी. रामवुमार आणि संस्थाचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. जागतिक दिव्यांग दिन कार्यक्रमात सकाळी खारघर मधील उत्सव चौक ते खारघर सेक्टर- ५ परिसरात प्रभात फेरी काढण्यात आली होती. या प्रभात फेरीत बौध्दिक दिव्यांग मुले, त्यांचे पालक, प्रशिक्षणार्थी तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सरिका प्रकाश, मेर्सी इट्टी, रणधीर कुमार ठाकूर, द हंस फाउंडेशनचे संचालक डॉ. शिवानी बंधू उपस्थित होते.

## कळंबोली सर्कलला कोंडीचा फेरा

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली सर्कल येथील मुंब्रा पनवेल महामार्गावर बांधलेला उड्डाणपुल हा सध्या अवजड वाहनांसाठी प्रतीक्षापूल बनला आहे. कळंबोली सर्कलवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न वाहतूक पोलीस सोडवू न शकत असल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

या सर्कलवर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सात ते आठ पोलीस कर्मचारी आणि वाहतूक वार्डन पोलिसांच्या मदतीला असतानाही वाहनचालकांना कळंबोली सर्कलवर मोठ्या प्रमाणात कोंडीचा सामना करावा लागत आहे.

एकाच सर्कलवर १६ विविध रस्ते आपसात जोडले गेल्याने ही कोंडी होत असली तरी वाहतूक पोलिसांनी रस्त्यावर दंडात्मक कारवाई करण्यासोबत वाहतूक नियमन करण्याची मागणी वाहनचालकांकडून जोर धरत आहे.

कळंबोली सर्कलचा विस्तार पुढील काही वर्षांत होईल. यासाठी सरकार पाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च करणार आहे. अडीच ते तीन वर्षे या कामासाठी लागणार असले तरी कळंबोली सर्कलवर सध्या मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीमुळे मुंब्रा बाजूकडून जेएनपीटी बंदर, मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई गोवा या महामार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना कळंबोली गावासमोर बांधलेल्या उड्डाणपुलावर अनेक मिनिटांची प्रतीक्षा करावी लागत आहे.

कळंबोली सर्कलप्रमाणे रोडपाली सिग्नल आणि नावडे गावासमोरील उड्डाणपुलाखाली वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते.

दोन दिवसांपूर्वी ही कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. मात्र यापूर्वीही अनेक चर्चा आणि प्रस्ताव पोलिसांकडून देऊनही वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटलेला नाही.

आज रात्रौ ९ वा.
उद्या सायं. ६ वा.
मेघा चित्रमंदिर-टॉकिज (अलिबाग)
ति.वि. मेघा चित्रमंदिर येथे सुरु




जादुगार जितेंद्र रघुवीर
शालेय विद्यार्थ्यांना तिकिटामध्ये १००/- रुपयाची खास सवलत
फोन बुकिंग - चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६

### श्रीवर्धनच्या रोठा सुपारीचे उत्पादन वाढणार

# तीन वर्षात 40 हजार सुपारी रोपांची विक्री

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

सुपारी बागायतदारांचे निसर्ग व तौक्ते चक्रीवादळात मोठे नुकसान झाले. दोन्ही वादळात तालुक्यातील ७० टक्के पोफळींचे नुकसान झाले, तर उर्वरित पोफळींवर रोगराई, किडींचा प्रादुर्भाव झाल्याने श्रीवर्धन रोठा सुपारीच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला. दोन-वर्षांत बागायतदारांनी जोमाने सुपारीची लागवड केली असून लवकरच उत्पादन हाती येण्याची शक्यता आहे.

चक्रीवादळापूर्वी श्रीवर्धनमध्ये ३६५.२५ हेक्टर क्षेत्रात रोठा सुपारीची लागवड होती. सुपारीला समुद्रकिनाऱ्यावरील गाळाची, पाण्याचा निचरा होणारी, तसेच बारमाही ओलावा असणारी जमीन मानवते. २० ते ३५ सेल्सिअस तापमान योग्य आहे. रोठा सुपारीत पांढऱ्या गराचे प्रमाण जास्त असून खाण्यास मऊ व फळाचा आकार आकर्षक असल्याने बाजारात चांगला भाव मिळतो. रोठ्याचे वार्षिक उत्पादन ६२६.१७ मेट्रिक टन इतके होते. एका हेक्टर क्षेत्रात २.२५ मेट्रिक टन उत्पादकता असल्याने नैसर्गिक आपत्ती येण्याआधी तालुक्यातील बागायतदारांचे २०१५ ते २०२० या पाच वर्षांतील सरासरी उत्पन्न अंदाजे तीन कोटी पंचाहत्तर लाख इतके होते, मात्र निसर्ग चक्रीवादळाने सुपारी बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वादळामुळे उंच पोफळी भुईसपाट झाल्या. अनेक पोफळींना उभ्या चिरा गेल्या. त्यात पावसाचे पाणी साठल्याने बुरशी धरली. जेमतेम ३० टक्के पोफळींनी तग धरला होता, परंतु तौक्ते चक्रीवादळात या पोफळींचे नुकसान झाले. वादळानंतर पोफळीला खवले कीड, कोळ रोग, अळंबी, बांड रोग अशा रोगराईने घेरले. निसर्गाच्या लहरीपणाने श्रीवर्धन रोठा सुपारीचे उत्पादनात मोठी घट झाली. सुपारी बागायतदारांनी पुन्हा जोमाने रोठा सुपारी लागवडी केली आहे. श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र व तालुक्यातील खासगी नर्सरीतून बागायतदार सुपारीची रोपे खरेदी करीत वाड्यांमध्ये रोठा लागवडीला प्राधान्य देत आहेत.



निसर्ग चक्रीवादळानंतर सात हजार, तर तौक्ते चक्रीवादळानंतर ३४,७३५ असे एकूण ४१,७३५ इतक्या संख्येने रोठा सुपारीच्या रोपांची विक्री श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र व तालुक्यातील खासगी नर्सरींमधून झाली आहे. कोकण भागात हमखास उत्पन्न व उत्पादन देणारा बाणावली नारळाच्या लागवडीकडे मात्र बागायतदारांनी दुर्लक्ष केले आहे. सध्याच्या परिस्थितीत रोठा सुपारीला बाजारात चांगला भाव कसा मिळतो आहे. सुपारीची प्रोसेसिंग युनिट कशी सुरू करता येईल, याबाबत राज्य सरकारने विचार करणे आवश्यक आहे. सुपारीचे आयुर्वेदिक महत्त्व लोकांना पटणे महत्त्वाचे आहे. सुपारी लागवडीकरिता बागायतदारांना सरकारने शंभर टक्के अनुदानात्मक लागवडीसाठी प्रोत्साहन द्यायला हवे, अशी मागणी रोठा बागायतदारांनी केली आहे.

> श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्रातून निसर्ग व तौक्ते चक्रीवादळानंतर शक्य होतील तेवढी रोठा सुपारीची रोपे बागायतदारांना पुरवली आहेत. तालुक्यात, तसेच पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील सुपारी बागायतदारांना रोठा सुपारीची रोपे पुरवण्याचे काम सुरू आहे. या हंगामासाठी १५ हजार रोठा सुपारीची रोपे तयार केली आहेत. त्यापैकी जून ते नोव्हेंबरअखेर सहा हजार रोपांची विक्री झाली आहे.
>
> –डॉ. सिद्धेश सावंत, अधिकारी, श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र.

# हा महाराष्ट्र कोणाचा?

यशवंतराव चव्हाण मंगल कलश घेऊन आले तो संयुक्त महाराष्ट्र मुंबईतील कामगार, खेड्यापाड्यातले कष्टकरी, शेतकरी यांचा होता. त्यामुळेच एक मे १९६० या दिवशी जेव्हा महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सोहळा झाला तेव्हा लता मंगेशकरांनी 'बहु असोत सुंदर संपन्न की महा' हे गाणे म्हटले. सामान्य मराठी जनांनी त्यांच्या सुरात सूर मिसळला. आता आपले, मराठी भाषकांचे राज्य आले याचा सर्वांना आनंद होता. आजचा महाराष्ट्र त्या सर्व सामान्य मराठी लोकांपासून किती दूर आलेला आहे याचे विदारक दर्शन गुरुवारी मुंबईत झालेल्या महायुतीच्या शपथविधी कार्यक्रमात घडले. कोणत्याही सरकारचा शपथविधी हा एक गंभीर कार्यक्रम असतो. अत्यंत काटेकोर वेळेनुसार तो चालू होतो व संपतो. सामान्यतः तो राज्यपालांच्या राजभवनात होतो. मात्र कार्यक्रमाला येऊ पाहणाऱ्यांची गर्दी वाढत चालल्याने आणि नव्याने सरकार स्थापन करणाऱ्यांना शक्तिप्रदर्शनाचे आणखी एक निमित्त मिळत असल्याने आता असे कार्यक्रम मोठ्या मैदानांमध्ये होऊ लागले आहेत. १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे मनोहर जोशी व गोपीनाथ मुंडे यांचे सरकार आले तेव्हा हा कार्यक्रम शिवाजी पार्कवर झाला होता. तर २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा वानखेडे स्टेडियमवर तो झाला होता. मात्र असे असले तरी त्यात किमान सभ्यता, संकेत पाळले जावेत अशी अपेक्षा असते. गुरुवारच्या कार्यक्रमाने हे सर्व संकेत पार पायदळी तुडवले गेले. हल्ली प्रत्येक गोष्टीला मनोरंजनाची जोड देण्याची नतद्रष्ट पध्दत सुरू झाली आहे. पूर्वी गणेश विसर्जनाच्या मिरवणुका साध्या होत्या. नंतर त्यात बँडपथके वगैरे आली. आता तर राज्याच्या काही भागात उत्तर भारताप्रमाणे अश्लील नाच करणाऱ्या नर्तकींचे कार्यक्रम ठेवण्याची पध्दत सुरू झाली आहे. फडणवीसांच्या शपथविधीला असे नाचकाम नव्हते हे महाराष्ट्राचे नशीबच म्हणायचे. पण तेथे संगीताचा जलसा मात्र जोरदार होता.

### भाजपची प्रचारसभा

वास्तविक मंत्र्यांनी पदाची शपथ घेण्यात एक गांभीर्य आहे. ते राखले जायला हवे. पण फडणवीस आणि मंडळींनी एका संगीतकार जोडीचा कार्यक्रम ठेवला. पण याहून वाईट म्हणजे या सर्व कार्यक्रमाला भाजपच्या प्रचार सभेची अवकळा आली होती. कारण, या गाण्यांमध्ये जो राम को लाये है, हम उनको लायेंगे अशी भाजपची प्रचारगीते गायली जात होती. एक तर ही गाणी हिंदी, शिवाय गायपट्ट्यातली मानसिकता व्यक्त करणारी आहेत. भाजपने अयोध्येत मंदिर बांधले हे खरे आहे. पण ते किंवा नरेंद्र मोदी श्रीरामाला अमुक ठिकाणी घेऊन येण्याइतके मोठे झाले की काय? लोकसभेच्या प्रचारात खुद्द उत्तर प्रदेशात हे गीत चालले नव्हते. पण आता महाराष्ट्रातील विजयानंतर ते मराठी जनतेच्या तोंडावर मारले जात आहे. याच सोहळ्यात शेकडो तथाकथित संतमहंतांना निमंत्रण होते. त्यांची बसण्याची वेगळी व्यवस्था होती. भाजपने महाराष्ट्रातील निवडणूक हिंदुत्वाच्या खोट्या प्रचाराच्या आधारे जिंकली आहे याचा पुरावा म्हणजे या गोसावड्यांची उपस्थिती होय. हे भुरटे लोक गावोगावी जाऊन मुस्लिमांच्या विरोधात विष ओकत होते. त्यामुळेच लोकांची माथी भडकली यात शंका नाही. शपथविधीच्या संपूर्ण कार्यक्रमात हाच उन्माद भरलेला होता. सूत्रसंचालन करणारी बाई इतर घोषणांसोबत जय श्रीराम असे नारे सतत देत होती. वास्तविक जनतेच्या खर्चाने होणारा हा एक सरकारी सोहळा होता. तो धर्म वा पक्षनिरपेक्ष असणे अपेक्षित होते. पण तेथे खुलेआम भाजपच्या आणि त्याहूनही वाईट म्हणजे धर्माच्या घोषणा दिल्या जात होत्या. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनाच्या आदल्या दिवशी होणारे राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचे झालेले हे निर्वाण हे महाराष्ट्राला लांच्छनास्पद आहे. डांगे, एसेम, उद्धवराव पाटील, अत्रे यांच्यासारख्या नेत्यांनी व कोट्यवधी मराठी जनतेने यासाठी ही लढाई केली नव्हती. या सर्वांच्या पराक्रमाला काल काळे फासले गेले.

### सर्व महाराष्ट्रावर डोळा

शपथविधी कार्यक्रम ही राजकीय घटना असते. त्यामुळे त्याला मुख्यतः राजकीय पक्षाचे नेते हजर असतात. कालच्या सोहळ्यात मात्र अंबानी, टाटा, बिर्ला असे उद्योगपती, बॉलिवूडवाले कलाकार अशांचीच गर्दी अधिक होती. देवेंद्रांच्या पत्नीच्या किंवा मुलीच्या वाढदिवसाची पार्टी असावी असा हा सगळा माहोल होता. दलित, शोषित, वंचित, कष्टकरी अशा समाजाची मते मिळवून युतीवाले विजयी झाले. मात्र त्यांच्या शपथविधी सोहळ्यात या घटकांना काहीही स्थान नव्हते. फडणवीस सरकार मुख्यतः कोणाचे आहे व कोणासाठी काम करील हे दर्शवणारी कालची ही सर्व गर्दी होती. हिंदुत्वाची विचारसरणी आणि बडे भांडवलदार, पैसेवाले, कंत्राटदार यांची युती पूर्वीच झालेली आहे. महाराष्ट्राने या युतीला सत्तेपासून दूर ठेवण्याचा आजवर आटोकाट प्रयत्न केला. पण तो फसला व युती जिंकली. त्या विजयाचा आनंद व्यक्त करण्यासाठी हा शपथविधी नावाचा घाट घालण्यात आला होता. गुजराती तसेच अन्य भाषक नेते आणि भाजप यांना मुंबईसहचा मराठी महाराष्ट्र याबाबत पूर्वापार एक आकस राहिलेला आहे. आता केंद्रात मोदी व शाह यांच्या रुपाने गुजराती नेते राज्य करतात. महाराष्ट्राचे कित्येक मोठे प्रकल्प या जोडीने गुजरातला पळवले. मुंबईचे महत्व कमी करण्याचा सतत प्रयत्न चालू आहे. महाराष्ट्राला अजिबात उपयोगाची नसलेली बुलेट ट्रेन मराठी लोकांवर लादण्याचा प्रयत्न चालू आहे. मुंबईचे बंदर, विमानतळ, वीजपुरवठा अदानीकडे गेला आहे. आता धारावीच्या निमित्ताने मोक्याची मौल्यवान जमीनही या अदानीला देण्याचे कारस्थान चालू आहे. कालचा शपथविधी म्हणजे ही कारस्थाने रेटली जातील आणि त्यांना विरोध करणाऱ्यांना चिरडले जाईल अशी द्वाही फिरवण्याचाच एक कार्यक्रम होता. त्यासाठी भारतभरातले मुख्यमंत्री आणि नेते जमा करण्यात आले. हा संदेश भारतातच नव्हे तर पूर्ण जगात जावा ही त्यामागची इच्छा होती. गुजराती, मारवाडी, पंजाबी, आंतरराष्ट्रीय भांडवलदारांचा आजवर केवळ मुंबईवर डोळा होता. आता पूर्ण महाराष्ट्र त्यांना हडपायचा आहे. महायुतीत तीन पक्षांसोबत आता हे सर्वही सामील आहेत.

विचार

# नवा डाव सुरू होताना...

**ताज्या निकालांनी उडवून दिलेली रणधुमाळी काहीशी शमल्यानंतर आता नव्या सरकारच्या कार्यपद्धतीबद्दल औत्सुक्य असणे स्वाभाविक आहे. आज राज्यापुढे अनेक कळीचे प्रश्न असून त्यांची तड कशी लावली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मुख्य म्हणजे सशक्त विरोध नसण्याच्या या काळात सरकारच्या ध्येयधोरणांची समिक्षा कशी, कोण आणि किती करणार याबाबत ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी व्यक्त केलेले मनोगत.**

**डॉ. उदय निरगुडकर**

अखेर महाराष्ट्रामध्ये बहुमताचे नवे सरकार स्थापन झाले आहे. नवीन सरकार स्थिर असण्यामागे अनेक कारणे आहेत. पहिली बाब म्हणजे कोणत्याही एका पक्षाने फुटून, दुसऱ्या विरोधी पक्षाला बरोबर घेऊन कोणी सत्ता स्थापन करण्याची सूतराम शक्यता नाही. ही निवडणूक तीन पक्षांनी एकत्र येऊन लढवली होती. त्यामुळेच ज्यांच्याविरोधात निवडणूक लढवली, त्यांच्याबरोबर जाऊन हे दोन्ही पक्ष स्वत:ला अनिश्चिततेच्या खाईत निश्चितच लोटणार नाहीत. तिसरी बाब म्हणजे विरोधी पक्ष एकत्र येऊन काही करामती करतील, फोडाफोडी करतील आणि सत्तासमिकरणे बदलतील, अशी आता तरी सूतराम शक्यता दिसत नाही. इथे लक्षात घ्यायला हवे की, देवेंद्र आणि एकनाथ शिंदे हे सर्वसमावेशक नेते आहेत. ते स्वत:च्या पक्षात जितके लोकप्रिय आहेत, त्यापेक्षा जास्त सहयोगी पक्षात आणि त्यापेक्षा अधिक विरोधी पक्षांमध्ये लोकप्रिय आहेत. यापलीकडे जाऊन आता विरोधी पक्षच एकसंध राहतील का, महाविकास आघाडी एकसंध राहील का, याचा विचार करावा लागेल. उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षातील आमदार एकत्र राहतील का, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. त्यामुळेच निकाल लागले तेव्हाही या सरकारच्या स्थिरतेपुढे प्रश्नचिन्ह नव्हते, आजही नाही आणि उद्याही असण्याची सूतराम शक्यता नाही.

महायुतीने निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी वा त्याआधीही अनेक आकर्षक आणि आश्वासक घोषणा केल्या. त्यातच लाडकी बहीण योजनेतील १५०० रुपयांची रक्कम २१०० रुपयांपर्यंत नेण्याच्या घोषणेचा समावेश होता. अशा अन्यही बऱ्याच घोषणा केल्या गेल्या. याबाबत बोलायचे तर महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीला हा २१०० रुपयांचा बोजा परवडण्याजोगा आहे. त्यामुळे यासंदर्भात काही अडचणी येऊ नयेत. परंतु, सक्षम वा अपात्र महिलांना त्याचा लाभ मिळत असेल तर ही बाब सर्वस्वी गैर आहे. हा गैरप्रकार थांबवण्यासाठी कठोर उपाययोजना करुन व्यवस्थेतील दोष शोधून दूर करणे गरजेचे आहे. आज समाजात एक वर्ग असा आहे की, कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी लाडक्या बहिणींना मिळालेला पैसा कामी येतो आहे. पण त्याचबरोबर काही महिलांनी या पैशातून छोटा-मोठा व्यवसाय करणे अपेक्षित आहे. हजार-पंधराशे मध्ये कोणता व्यवसाय सुरू करता येणार? असा प्रश्न नक्कीच विचारला जाईल, पण इतक्या रकमेत सुरू करता येण्यासारखे अनेक छोटे-मोठे व्यवसाय आहेत. अशा व्यवसायांमध्ये महिलांनी पैसे गुंतवले तर रुपयाला रुपया लागतो, पैशाला पैसा लागतो आणि त्यातूनच सूक्ष्म उद्योजिका म्हणून महिलांच्या कारकिर्दीची सुरूवात होऊ शकते. या पद्धतीने सध्या अनेक महिलांनी व्यवसाय सुरू केलेही आहेत. मात्र यासंदर्भात त्यांना योग्य ते मार्गदर्शन अपेक्षित आहे. त्यांना मदतीची, व्यवस्थापनाच्या अर्थाने सुजाण करण्याची गरज आहे.

मात्र सध्या ही गरज भागताना दिसत नाही. महिला एकमेकींना मदत करत असल्या तरी शासनाने त्यांच्या पातळीवर याची दखल घेऊन पुढाकार घेण्याची कधी नव्हे इतकी गरज निर्माण झाली आहे. त्यामुळेच नव्या सरकारला या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावेच लागेल. याचे कारण म्हणजे या महिलांच्या मतांवरच ते निवडून आले आहेत. महिला इतक्या मोठ्या प्रमाणात बाहेर पडल्या नसत्या तर मतदान वाढले नसते. वाढलेल्या साडेपाच टक्के मतदानातील तीन-साडे तीन टक्के मते महिलांची असल्याचे सरकारला विसरुन चालणार नाही. त्यांनी रांगा लावून महायुतीच्या पदरात एकगठ्ठा मते टाकली आहेत. उमेदवाराकडे न पाहता या योजनेकडे पाहून मतदान केले आहे. त्यामुळेच सरकारला ही योजना पूर्ण क्षमतेने राबवावीच लागेलच, खेरीज राज्याला त्याचा भार परवडावा यासाठी यातूनच उद्योग निर्माण करण्यासाठी साह्यकारी भूमिकाही घ्यावी लागेल. हे सगळे न केल्यास दिवसेंदिवस हे प्रकरण सरकारला जड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नव्या सरकारपुढे आव्हाने अनेक

नव्या सरकारपुढील पहिले आव्हान प्रचंड मतदान आणि मताधिक्यातून लोकांच्या गगनाला भिडलेल्या अपेक्षांना खरे उतरण्याचे आहे, कारण त्या पूर्ण करणे, तसे प्रशासन देणे सोपे नाही. प्रत्येक विजयामध्ये पडझडीची बिजे असतात आणि प्रत्येक पडझडीमध्ये विजयाचे संकेत असतात. एव्हरेस्टवर जाणे कठीण असते पण तिथे टिकून राहणे त्यापेक्षा कठीण असते. त्यामुळेच सर्वसामान्यांच्या वाढलेल्या अपेक्षांना पुरे पडण्याचे मोठे आव्हान नव्या सरकारपुढे आहे. खेरीज सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हमीभावाचे, खरेदी-विक्रीचे अनेक प्रश्न आहेत. ते पूर्णपणे मार्गी लागलेले नाहीत. तरीदेखील या मंडळींनी सरकारवर विश्वास ठेवला आणि भरभरुन मतदान केले. त्यामुळेच नव्या सरकारकडून त्यांच्या आक्रोशाला उत्तर मिळायला हवे. सरकारपुढील हे एक महत्त्वाचे आव्हान म्हणायला हवे.आरक्षणाचा तिढा सोडवण्याचे आव्हान

लवकरच सर्वोच्च न्यायालयात आरक्षणाचा मुद्दा अंतिम सुनावणीसाठी येईल. त्यावेळी ते न टिकल्यास हा प्रश्न चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी अल्पसंख्येत, अल्पमतात आणि अल्पशक्तीत असणारे विरोधक त्याचे भांडवल करतील. परिणामी, सामाजिक ताणतणावाचे, जातीय भिंती गाडण्याचे, सामाजिक सलोख्याचे फार मोठे प्रश्न निर्माण होऊ शकतात. म्हणूनच त्यासंदर्भात कोणती भूमिका घेतली जात आहे, हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. सर्वोच्च न्यायालयात आरक्षणाचा खटला कसा लढवला जाईल हे बघणे या दृष्टीने गरजेचे आहे. त्याचबरोबर महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न सरकारला प्राधान्याने हाताळावा लागेल. नागरीकरणाच्या वाढत्या अपेक्षांची बाबही नवीन सरकारला लक्षपूर्वक हाताळावी लागणार आहे.

उदाहरण द्यायचे तर कल्याण-डोंबिवलीमधून विक्रमी मतांनी उमेदवार निवडून आले. पण त्यांचे अभिनंदन करताना सर्वसामान्यांची प्रतिक्रिया पाहिली तर डोंबिवलीला १५ डब्यांची लोकल कधी सुरू होणार, लोकल वेळेवर धावणार का, जीवघेणा प्रवास कमी होणार का असे प्रश्न विचारले गेलेले दिसले. पुण्यासारख्या शहरातही वेगळी परिस्थिती नाही. विक्रमी मतदान झालेल्या या शहरातही नागरिकांनी सिंहगड रोडवरील उड्डाणपुलाचे रखडलेले काम, तिथे मेट्रो येण्यास आणखी पाच-सात वर्षांचा काळ असणे, वाहतुकीची समस्या, मुजोर रिक्षावाले, बेभरवशाची प्रवासी व्यवस्था हे मुद्दे उपस्थित केले. थोडक्यात, सुजाण नागरिक प्रशासन, उत्तम सार्वजनिक व्यवस्था, पायाभूत सुविधा याविषयी बोलत आहेत. त्यामध्ये सरकार कमी पडले तर खैर नाही. बालगंधर्वांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवलेले एक सुंदर वाक्य आठवते. ते म्हणतात,'आज वर आहे ते उद्या खाली जाणार असते आणि आज खाली आहे ते उद्या वर येणार असते. हा निसर्गाचा नियम नेहमी लक्षात ठेवा!' त्यामुळेच जास्तीत जास्त काळ वर राहण्यासाठी प्रयत्न करत असताना सरकारने शहरी पायाभूत सुविधा आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य द्यावे लागेल, खेरीज महिलांच्या सन्मानाचा, सुरक्षिततेचा प्रश्न तातडीने हातात घेणे गरजेचे आहे.

सक्षम विरोधक नसल्याचे दुष्परिणाम

राज्यात आता सक्षम विरोधक नसणे ही नक्कीच खूप मोठी आणि विचारात घेण्याजोगी गोष्ट आहे. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखा एखादा अभ्यासू नेता सभागृहात नसतो तेव्हा ती केवळ त्यांच्या पक्षाची नव्हे तर एकूणच लोकशाहीच्या प्रक्रियेची हानी असते. अर्थातच आता नवीन आमदारांना त्यांची जागा भरुन काढण्याची संधी आहे. पण तरीही विरोधी पक्षाकडे विरोधी पक्षनेता निवडण्याइतपत देखील संख्याबळ नसण्याचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे तुमचे आमदार गळाला लागून स्थिती आणखी वाईट होऊ शकते आणि दुसरे म्हणजे सत्तारुढ पक्ष उन्मादी होऊ शकतो.

कारण त्यांना अडवणारे 'चेक अँड बॅलन्स'चे तत्वच उरत नाही. आपली संसदीय लोकशाही 'चेक अँड बॅलन्स'वर चालते. पण तेच नसेल तर सगळे एकतर्फी होऊ शकते. ही गोष्ट निश्चितच खूप वाईट, घातक असते. म्हणूनच विरोधी पक्षाच्या अल्पसंख्य (जातीधर्मावरुन नव्हे तर संख्येवरुन) असण्याचा सन्मान ठेवला गेला पाहिजे. त्यांच्याही मागण्यांचा विचार झाला पाहिजे. एकूणच राजकारणात हरवत चाललेली सहिष्णुता, उदारता, परस्परांप्रती स्नेह जपले गेले पाहिजे.

शेवटी निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे आणि लोकशाही म्हणजे निवडणुका नव्हे. लोकशाही म्हणजे लोकांचा न्याय, विरोधी मतांचा आदर, उत्तम प्रशासन. हे दाखवण्याची संधी विरोधी आणि सत्तारुढ पक्ष यांना एकत्रितपणे मिळते आहे. याचा चांगल्या प्रकारे लाभ करुन घेतला जाईल हीच अपेक्षा.

आजकाल

# कमला हॅरिसचा पराभव आणि त्याचे धडे

**किरण मोघे**

नुकत्याच अमेरिकेत सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. त्यात डॉनल्ड ट्रंप मोठ्या मताधिक्याने निवडून आले. प्रतिस्पर्धी कमला हॅरिस यांची हार झाली. कोणी विचारेल की त्याच्याशी आपला काय संबंध? तर मुद्दा असा आहे की अमेरिका हा एक असा बलाढ्य देश आहे ज्याचा संपूर्ण जागतिक आर्थिक - राजकीय व्यवस्थेवर मोठा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. शिवाय यंदाच्या अमेरिकन निवडणुकीत असे काही मुद्दे होते ज्यांचे जगातल्या इतर देशातल्या आर्थिक सामाजिक घडामोडींशी पण संबंध होता आणि आहे - उदा. सत्ताधारी डेमोक्रॅटिक पक्षाने इस्राइल-पॅलेस्टाईन युद्धात इस्राइलला दिलेला पाठिंबा; ट्रंपच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन - मागा' (अमेरिकेला परत एकदा बलाढ्य करा) या घोषणेचा आणि आपल्याकडील 'विश्वगुरू'च्या उद्घोषात, मुस्लिम विरोधी प्रचारात आणि ''घुसपेटिया'' (ट्रंप साठी परदेशातून गैर मार्गाने आलेले नागरिक) यात बरेच काही साम्य आहे! तर जगभरातल्या महिलांच्या दृष्टीने अमेरिका पहिल्यांदा महिला राष्ट्राध्यक्ष निवडून देऊन इतिहास घडवेल का हा देखील महत्त्वाचा प्रश्न होता.

पण हॅरिसचा चांगलाच पराभव झाला! ५१% जनमत ट्रंपच्या बाजूने राहिले, तर प्रतिनिधी मंडळात आणि सेनेट मध्ये देखील रिपब्लिकन पक्षाला बहुमत मिळाले असल्याने ट्रंप यांचा विजय अनेकार्थाने निर्णायक ठरला आहे. मतदानाच्या विश्लेषणाचे जे काही अहवाल उपलब्ध झाले आहेत, त्यावरून असे दिसते की ट्रंप यांना श्वेतवर्णीय (गोऱ्या) अमेरिकन पुरुषांची ६०% मते तर मिळलीच, परंतु ४९% लॅटिनो (दक्षिण अमेरिकेत पाळमुळ असलेल्या) पुरुषांनी आणि २५% कृष्णवर्णीय पुरुषांनी देखील ट्रंप यांना मते दिली. त्यामुळे काहीनी असा अर्थ लावला आहे की अमेरिकन पुरुषांना कमल हॅरिस सारखी स्त्री राष्ट्राध्यक्ष पदावर नको होती आणि त्यामुळे त्यांचा पराभव झाला.



हे खरे आहे की ट्रंप यांचा निवडणूक प्रचार मोठ्या प्रमाणात पुरुषी अहंगंडाने भरलेला होता आणि त्यांनी कमलाची उघड हेटाई केली. तसेच अलीकडे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने गर्भपाताच्या अधिकाराच्या विरोधात महत्वाचा निकाल दिल्याने स्त्रियांसाठी हा महत्वाचा मुद्दा होता आणि त्यामुळे स्त्रियांची मोठ्या संख्येने मते कमलाला मिळतील अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात ५३% श्वेतवर्णीय स्त्रियांनी आणि ३९% लॅटिनो स्त्रियांनी (आणि १०% कृष्णवर्णीय स्त्रियांनी सुद्धा !) ट्रंपला मते दिली! याचा अर्थ स्पष्ट आहे, की सार्वत्रिक निवडणूक अशा एकाच आयडेंटिटी भोवती होत नसून सर्वसाधारण मतदारांच्या दृष्टीने अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक मुद्दे असतात जे लक्षात घेऊन जनता निवड करीत असते. त्यामुळे गर्भपाताचा अधिकार आणि स्त्री राष्ट्राध्यक्ष यांच्या पलीकडे जाऊन सर्वच अमेरिकन नगरिकांच्या समोर काही महत्वाचे प्रश्न होते, ज्याची समाधानकारक उत्तरे कमला आणि डेमोक्रॅटिक पक्षाला देता आली नाही, किंवा प्रतिस्पर्धी उमेदवार आणि पक्ष पासून आपली भूमिका वेगळी कशी आहे हे सांगता आले नाही. यात प्रामुख्याने दोन महत्वाचे मुद्दे आहेत  एक, की गजा येथे इस्राइल कडून होणारा नरसंहार थांबवणार आणि पॅलेसतीने शास्त्रपूरवठा करणार नाही अशी स्पष्ट भूमिका न घेता, अमेरिकेत या युद्धाला असणारा विरोध डावलून हॅरिस आणि डेमोक्रॅटिक पक्षाचा जो उघड पाठिंबा राहिला, त्याचा निश्चित विपरीत परिणाम झाला. दुसरे की डेमोक्रॅटिक राजवटीत अमेरिकेची अर्थव्यवस्था खालावली, वाढत्या महागाई आणि बेरोजगारी वर आपण काय वेगळे उपाय करणार आहोत हे कमला यांना सांगता आले नाही, उलट त्यांच्या पूर्ण निवडणूक प्रचार मोहिमेत त्यांची अमेरिकेच्या मोठ्या भांडवलदारांसोबत ऊठबस दिसली, ज्याच्यामुळे त्यांच्या पाठीशी हाच वर्ग आहे असे चित्र निर्माण झाले. जनतेत एक संभ्रम निर्माण झाला, आणि त्याचा निंवडणुकीतील सहभागावर देखील परिणाम झाला. प्राथमिक अंदाजानुसार फक्त ६४% मतदान झाले. मागील काही निवडणुकीपेक्षा हे जास्त असले तरी याचा अर्थ अनेक नागरिकांनी मत दिले नाही. ही आपल्या देशातल्या परिस्थिति पेक्षा फार वेगळी नाही, कारण जेव्हा मतदारांना पक्षांमध्ये फार धोरणात्मक किंवा कार्यक्रमाच्या पातळीवर फरक दिसत नाही तेव्हा एक प्रकारची निराशा आणि कंटाळा येऊन ते म मंतदानात सहभागी होत नाहीत.

अर्थात या सर्व गुंतागुंतीच्या परिस्थितीत जो अमेरिकन नागरिकांनी पर्याय निवडला आहे तो अधिक चिंतादायक आणि गंभीर असून, ज्या कारणांसाठी आणि प्रश्नांच्या भोवती निवडला गेला, ते कितपत सुटतील असा मोठा प्रश्न आहेच. श्रीमंत कॉर्पोरेट आणि वरच्या वर्गांवरचे कर कमी करणार, आणि अमेरिकेतले 'घुसखोर' हाकलून लावणार अशी ट्रंपची घोषित भूमिका असून, त्यांनी गेल्या काही दिवसांत जी संभाव्य सल्लागारांची यादी जाहीर केली आहे,त्यावरून कोणालाही धडकी बसावी. अब्जाधीश एलॉन मस्क पासून अत्यंत उजवी, प्रतिगामी आणि कर्मठ भूमिका घेणारे वकील, मिलिटरी अधिकारी, किंवा संबंधित पदाच्या विषयाची फारशी जाण नसणारी मंडळी त्यांनी महत्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय पदांसाठी निवडली आहेत. त्यात उघड इस्राइलच्या बाजूने भूमिका घेणारे आहेत; शिवाय आयातीवर निर्बंध वाढवणे, मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर निवास करणाऱ्यांना देशातून हाकलून लावणे, मेक्सिको देशाच्या सीमेवर भिंत बांधणे, असा त्यांचा मूलभूत आर्थिक प्रश्नांना बगल देणारा कार्यक्रम आहे. त्यातून अमेरिकन जनतेमध्ये अधिक निराशा आणि हताशा निर्माण होऊ नये एवढीच आपण अपेक्षा करु शकतो.

आज मूलभूत प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरलेल्या राजकीय शक्ती आणि व्यक्ती जनतेला भावनात्मक आवाहन करून, आपले प्रश ''इतरांच्या'' (म्हणजे ''परक्या'' किंवा ''दुसऱ्या'' धर्माचे, जातीचे, वंशाचे, देशातले, इत्यादि) मुळे निर्माण झाले आहेत आणि आपणच कसे श्रेष्ठ आहोत असा आव आणणारे जगभरात ठिकठिकाणी निवडून येत आहेत. आपला देश सुद्धा त्याला अपवाद नाही. परंतु इतिहास आणि वर्तमान असे सांगतो की प्रश्नांची उत्तरे लोकाभिमुख आर्थिक धोरणांमध्ये आणि एकमेकांच्या धर्म-पंथ-संस्कृतीचा आदर करून गुंता सोडवण्यात सापडतात. सर्वसामान्य लोकांच्या जितक्या लवकर हे लक्षात येइल, त्यात अवघ्या जगाचे हित आहे. अमेरिकन निवडणुकीचा हा धडा आहे. **(साभार)**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**७ डिसेंबर**

**१९२२:-** लेखक, प्रवचनकार, कीर्तनकार संत जैरामदास धर्माजी रवरकाटे उर्फ लहरी यांचा जन्म. इयत्ता चौथी उत्तीर्ण असलेला संत लहरी यांनी चाळीसहून अधिक ग्रंथ लिहिलेत. त्यामध्ये लहरी भजनावली, सुविचार भजनावली, लहरी संतसंग परमार्थ मिळून दहाच्या आसपास मराठी भजनसंग्रह तसेच दहाहून अधिक हिंदी भजनसंग्रह तसेच आरतीसंग्रह, श्लोकसंग्रह त्यांनी लिहिले आहे. **१९३० :-** चंद्रलेखा नाट्यसंस्थेचे सर्वेसर्वा मोहन वाघ यांचा जन्म. **१९३६ :-** 'शारीरिक शिक्षण' या विषयांवर लेखन करणारे डॉ. पद्माकर महादेव आलेगांवकर यांचा जन्म. ह्यांचे 'शारीरिक शिक्षणाचे आयोजन व नियोजन आणि निरीक्षण' या ग्रंथासह शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरुप' यातून भारत व जगातील १० देशांचा शारीरिक शिक्षणाचे दृष्टीने परिचय करुन दिला. याशिवाय नियतकालिकांतून लेखन केले आहे. **१९४१ :-** ग्वाल्हेर संस्थानचे राजकवी भास्कर रामचंद्र तांबे यांचे निधन. हिंदी काव्य, उर्दू नज्म आणि गजल यांच्याशी झालेला परिचय तसेच वैदिक परंपरेचे शास्त्रशुध्द शिक्षण असे संस्कार घेऊन त्यांनी मराठी कवितेत विशुध्द आनंदवादाची मळवाट रुंद केली. नीती, सत्य आणि सौंदर्य हे गुण त्यांच्या काव्यात अंगभूत आहेत आणि त्यामुळेच हे काव्य आजतागायत टिकलेही आहे. राजकवी तांबे यांची समग्र कविता हा त्यांचा काव्यग्रंथ १९३५ साली प्रथम प्रकाशित झाला, तेव्हापासून त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. **१९४६ :-** जैन तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका प्रा. माधवी घनश्याम यांचा जन्म. 'तर्कदीप, विज्ञान आणि समाज' या पाठ्यपुस्तकांचे लेखन तसेच 'परिमल जनरल नॉलेज' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९५४ :-** कवी भास्कर गजानन पाटील यांचा जन्म. 'आईच्या बांगड्या' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध. **१९५५ :-** अभिनय वादक, दिग्दर्शन व लोककला यात पारंगत असणारे लेखक पांडुरंग सोमाजी भेलावे / भलावी यांचा जन्म. यांची 'रानपाखरं वेडी झाली', है गीत तुझ्यासाठी' ही नाटके, 'पुण्याच्या बायका, मामला चोरीचा' हा एकांकिकासंग्रह. 'सानुली' हा झाडी कवितासंग्रह. 'कचारगड' हे नवसाक्षर साहित्य अशी ग्रंथसंपदा. १९५९ : - लेखक, पत्रकार, मुंबई पत्रकार संघाचे संस्थापक आणि दैनिक 'प्रभात' चे संपादक श्रीपाद शंकर नवरे यांचे निधन. 'प्रभात' मधील त्यांचे महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांच्यावर लिहिलेले मृत्युलेख संस्मरणीय ठरले. **१९७६ :-** विचारवंत शिक्षणतज्ञ गोवर्धन पारिख यांचे निधन. **१९७८ :-** मुंबई पत्रकार संघाचे संस्थापक, दै. प्रभादचे संपादक ध्येयवादी पत्रकार श्रीपाद शंकर नवरे यांचे निधन. मौज, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स आदी दैनिकातून त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले. **१९९३ :-** नाट्य सिने अभिनेत्री व लेखिका स्नेहप्रभा प्रधान यांचे निधन. 'स्नेहांकिता' हे त्यांचे आत्मचरित्र गाजले, वादग्रस्तही ठरले व त्यावरुन 'सर्वस्वी तुझाचं' हे नाटकही त्यांनी लिहिले. 'पळसाला पानं तीन' हा ललित लेखसंग्रह आणि 'रसिक प्रेक्षकांस सप्रेम' हे त्यांनी केलेल्या भूमिकांचे विश्लेषण करणाऱ्या लेखांचे पुस्तकेही त्यांनी लिहिले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## लोकसंसद

### जुन्नरच्या आंब्याला जीआय टॅग मिळाला!

केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या चेन्नई येथील उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागातर्फे देशभरातील उत्पादनांना भौगोलिक मानांकन (जिऑग्राफिकल इंडिकेशन टॅग) दिला जातो. दोन दशकांपूर्वी देशातील पहिला जीआय टॅग सुप्रसिद्ध दार्जिलिंग चहाला देण्यात आल्यानंतर आतापर्यंत देशातील ६४३ विविध उत्पादनांना जीआय टॅग देण्यात आला आहे. त्यात आता आपल्या जुन्नरच्या हापूस आंब्याची भर पडली आहे. **- प्रदीप मोरे, अंधेरी**

# कळंबोली वाहतूक शाखेची वाहतूकदारांसोबत कॉर्नर बैठक!

। पनवेल । वार्ताहर ।

कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीत जड अवजड वाढत्या वाहनांचे संख्येमुळे पार्कींगची समस्या निर्माण होत असून सदर वाहनांचे पार्कींग करीता जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही वाहन चालक हे त्यांची वाहने कळंबोली लोखंड व पोलाद बाजाराचे हद्दीतील सेवा रस्त्यावर ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी पार्क करीत आहेत. त्यामुळे सदर मार्गावर सकाळ व संध्याकाळचे वेळेस इतर वाहनांचे वाहतूकीकरीता कमी लेन उपलब्ध होत असल्याने वाहतूक कोंडी होत असलेबाबत मल्टीमेडीया तसेच ट्विटरद्वारे तक्रारी या तसेच वरिष्ठ कार्यालयात प्राप्त होत आहेत.

सदर मार्गावर जड अवजड वाहनांचे पार्कींगमुळे वाहतूक कोंडी होणार नाही. याकरीता पोनि. हरीभाऊ बानकर यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि, साठे व पथक यांनी जड अवजड वाहतूकदार यांची कॉर्नर बैठक बिमा नाका या ठिकाणी घेतली. सदर मार्गावर जे वाहनचालक दुसऱ्या व तिसऱ्या लेनमध्ये वाहने पार्क करतील त्यांचेवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे परंतू वाहने पार्कींगची संख्या कमी होत नसल्याने सदर वाहनचालकांवर भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये कारवाई सुरू करण्यात आलेली असल्याचे समक्ष सांगितले आहे. तसेच यापुढे लोखंड व पोलाद बाजाराचे मुख्य सेवा रस्त्यावर दोन्ही बाजुस दोन तसेच तीन लेनमध्ये वाहने पार्क करू नयेत, वाहतूक पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे व नियमांचे पालन करावे याबाबत माहिती देण्यात आली अन्यथा प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**
**स्व. परेश नवीनचंद्र गाला स्मरणार्थ सांताक्रूझ**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ७ डिसेंबर

१) श्री. दिगंबर रामचंद्र वारंगे अलिबाग, ७-१२-१९४२
२) श्री.अरविंद नथुराम कालवणकर मु.किहीम, अलिबाग, ७-१२-१९५३
३)श्री.मच्छिंद्रनाथ शिमगा झिटे अलिबाग, ७-१२-१९४८
४) श्री.अशोक नागू भगत कोळीवाडा, अलिबाग ७-१२-१९५३

## पुरवठा विभागात नागरिकांची गर्दी

**पनवेल :** पनवेल तहसील कार्यालयात पुरवठा विभागात नागरिकांची गर्दी पहावयास मिळत आहे. रेशन कार्ड तसेच इतर कामांसाठी पुरवठा विभागात नागरिकांच्या रांगा लागत आहेत. पुरवठा अधिकाऱ्यांच्या धिम्या कारभारामुळे या ठिकाणी कामांना उशीर होत असल्याचे बोलले जात आहे. नव्याने नियुक्त झालेल्या पुरवठा अधिकाऱ्याकडून कामांना उशीर होत असल्यामुळे अनेक नागरिकांना या ठिकाणी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. रेशन कार्ड वर सही घेण्यासाठी आणि कार्ड वरील नावे कमी करण्यासाठी जवळपास एक ते दीड तासांपेक्षा अधिक वेळ नागरिक रांगेत उभे होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. जगदिश दत्तात्रय उर्फ दत्तु दगडे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे साळोख तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १४ | ३ | ०.३०.५०<br>पो.ख. ०.०४.४०<br>एकूण ०.३४.९० | ३.११ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०७/१२/२०२४
सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
**ॲड. नरेश मारूती बैलमारे**
मो.९२२६३३१५२६/९८२३९७८७८५.
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत-रायगड.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### Anjuman Islam Janjira Murud
### Murud Janjira, Dist.Raigad

Applications are invited for the following Granted posts

| Sr. No. | Name of the Post | Subject | Required Qualification | No.of Post | Status | Class |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | English & Social Science | B.A. B.Ed | 1 | | IX-X |
| 2 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Maths & Science | B.Sc. B.Ed TET/CTET Paper 2nd | 1 | | VI-VIII |
| 3 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Any Subject | HSC, D.Ed TET/CTET Paper 1st | 3 | | V |
| 4 | Assistant Teacher (Shikshan Sevak) | Maths & Science | B.Sc. B.Ed | 1 | | IX-X |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud Pin Code 402401.
Phone -02144-274058, Mobile No. 8007495489
Email Id **aijheadoffice1907@gmail.com**

**Note :-**
1. Candidate whose name have appeared in BOGUS passed list of MAHA-TET Exam (Maharashtra) issued by Maharashtra Prishad Pune are not allowed to apply for the said post.
2) After scrutiny of all applications received only those candidate will be informed of the "Walk in Interview" who satisfy of all the norms and qualification.

**Gen Secretary**
**Anjuman Islam Janjira Murud**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public by and large that we are instructed by our client, **M/S. PRIYAL REALTY**, through its partners, to investigate the ownership rights of the landowners **Mr. Sanjay Janardan Gandhi** and **Shital Satish Kolvankar**, in respect of the plot of land bearing **Survey No. 26/1/2**, area admeasuring about **472 sq. mtrs.**, lying, being and situated at Village - Chendhare, Taluka- Alibaug, District- Raigad **(Said Plot)**, as my clients are desirous of acquiring the development rights of the said Plot.

**ALL PERSONS** having any claim to, or any share, right, title and interest against or to the said plot by way of sale, transfer, assignment, mortgage, lien, lease, trust, gift, charge, easement, possession, inheritance, maintenance and development rights or otherwise howsoever, are hereby required to make the same known to the undersigned in writing, at our office address mentioned below within 15 days from the date of publication hereof, along with documentary proof in support of such claim, failing which we shall certify the ownership rights of **Mr. Sanjay Janardan Gandhi** and **Shital Satish Kolvankar** to the said plot, without having any reference to such claim, if any, and the same shall be deemed/considered to have been waived and/or given up.

**THE SAID PLOT ABOVE REFERRED TO:**
ALL THAT piece and parcel of land bearing Survey No. 26/1/2, area admeasuring about 472 sq. mtrs., lying, being and situated at Village - Chendhare, Taluka- Alibaug, District- Raigad.

**Dated this 06th Day of December, 2024**

Sd/-
**Adv. Parth Chande**
**KC & Partners,**
**1202, 12th Floor, The Landmark,**
**Plot No - 26A, Sector 7, Kharghar,**
**Navi Mumbai, Maharashtra 410210**

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री नरेंद्रकुमार धनराज धडडा, श्री निहाल धनराज धडडा, श्री जयकुमार धनराज धडडा रा मुंबई, यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सालवड, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३५/५ एकुण १७.१० गुंठे, सर्व्हे नं ३५/४ एकुण ५८.१० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : ०७/१२/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गौरकामत, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) विनायक रामचंद्र सोमवंशी २) सोनम योगेश सुर्वे ३) निता रामचंद्र सोमवंशी यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २४ | १ | ०-४५-००<br>पैकी ०-२५-०० | ५=७८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०६/१२/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २१ व्या पशुगणनेस सुरूवात

**पनवेल :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २१ व्या पशुगणनेस सुरूवात होत आहे. ही पशुगणना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मोबाईल पच्या माध्यमातून केली जाणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या पशुगणनेस सहकार्य असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या पशुगणनेमध्ये पनवेल क्षेत्रात आढळणाऱ्या पशुधनाच्या १६ प्रजातीची जातिनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय व उपयोगानुसार आकडेवारी गोळा केली जाणार आहे. या पशुगणनेमध्ये गाय-म्हैस, शेळी-मेंढी, घोडे, श्वान इत्यादी व कुक्कुट पक्षी जसे की कोंबडया, बदक इत्यादीचा समावेश असणार आहे. या पशुगणनेमुळे विविध फायदे होणार असून त्यानुसार धोरण तयार करता येणार आहे. या पशुगणनेमुळे दुध, अंडी, मांस व लोकर इ. पशुजन्य उत्पादनाचा अंदाज करता येणार असून याचबरोबर त्यांच्या लसीकरणाचा कार्यक्रम राबविता येणार आहे. पशुगणनेनुसार पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या ठरविणे विविध योजना राबविणे शक्य होणार आहे.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बबन शंकर देशमुख | ६१ | ६ | ०-१८-०० | ३.१२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०७/१२/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता : कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/८८८८०९८०८८

### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दूरध्वनीकार्यालय:- ०२२-२७४५८०४०,४१,४२ फॅक्स :-०२२-२७४५२२३३
ई-मेल:-panvelcorporation@gmail.com वेबसाईट-www.panvelcorporation.com
जा.क्र. पमपा/पापुवि/९९२४/प्र.क्र.१४/९४३/२०२४ दि.०४/१२/२०२४

**नागरिकांना जाहिर आवाहन**

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला होणारा पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील होणारा पाणीपुरवठा सोमवार दि. ०९/१२/२०२४ सकाळी ९.०० ते मंगळवार दि. १०/१२/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी खालीलप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

अ) सोमवार दि. ०९/१२/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.
१) हरिओमनगर उंच जलकुंभ, ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एच.ओ. सी.उंच जलकुंभ, व चौकोनी टाकी, मार्केटयार्ड उंच जलकुंभ येथुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

ब) मंगळवार दि. १०/१२/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.
१) गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, भाजी मार्केट उंच जलकुंभ, सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ (गोलटाकी) व पटेल मोहल्ला उंच जलकुंभातुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

तसेच पुढील २ ते ३ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेवून मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, माझ्या अशिल, सौ.शालिनी मोदी, रा.मोदी हाऊस, एन.४, ग्रेटर कैलाश ७१, दक्षिण दिल्ली-११००४८, यांनी खाली नमूद जमिनमिळकत श्री.सुबोध चंद्रकांत हळदणकर, वगैरे यांच्याकडून दि.०४/०४/२०२४ रोजीच्या कराराने विकत घेतलेली आहे.

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| टेकाळी, ता.अलिबाग जि.रायगड | ७६ | २-७३-५०<br>पैकी<br>०-६०-२६ | ७.१९ |

संबंधीत करार स्वाक्षरीत करताना माझ्या अशिलांनी बयाणा रक्कम रू.११,००,०००/- जमिनमालकांना अदा केलेली आहे. संबंधीत जमिनमालकांनी दि.३०/०६/२०२४ पूर्वी संदर्भित जमिनमिळकतीचे अंतिम खरेदीखत करारातील अटींची पुर्तता करून पूर्ण करून द्यावयाचे मान्य व कबूल केले होते. मात्र, संबंधित जमिनमालकांनी कराराच्या मुदतीत कसलीही पुर्तता केलेली नसून व्यवहार पूर्ण करण्यास टाळाटाळ केलेली आहे.

संबंधीत जमिनमालक व माझे अशिलांचे दरम्यानचा करार हा आजदेखील अस्तित्वात आहे व त्यामुळे संदर्भित जमिनमिळकतीचा व्यवहार अन्य कोणीही करू नये. कोणीही संदर्भित जमिनमिळकत विकत घेण्याचा प्रयत्न केल्यास असा व्यवहार हा मुळातच बेकायदेशीर ठरविण्यात येईल व तो माझ्या अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०६/१२/२०२४

**राजेंद्र दा.पाटील**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग जि.रायगड
मो.९८२२५२८९३१.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे अलिबाग (म्हाडा) ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहेत. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | बिनशेती क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड | २९/१/अ/१ (प्लॉट नं.सी-३) | ५९७.४३ | ४२०० |

वर नमुद केलेल्या सदर बिनशेती मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्न, वस्त्र, साठेकरार, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदपत्रे घेऊन येऊन हरकती नोंदवून खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची बिनशेती मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

अलिबाग,
तारीख : ०६/१२/२०२४

सही/-
**(ॲड. सचिन दिनकर पाटील)**
बी. ए. एल. एल. बी (मुंबई)
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९२२६८७२६९०

### महाराष्ट्र शासन
### सहकार विभाग

**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID : arcsalibag@gmail.com

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,
अर्ज क्रमांक :-११४/२०२४
जा.क्र.- ७३९

जय भवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग
तर्फे व्यवस्थापक सौ. रेष्मा पाटील — अर्जदार

विरूद्ध

१. श्री. विश्वनाथ नारायण कवळे
मु. बेलाई पारवाडी पो. आग्राव ता. अलिबाग
२. श्री. सखाराम शंकर जांभोरकर
मु. विद्यानगर मुकबधिर शाळे समोर पो.वरसोली ता.अलिबाग — जाब देणार
३. श्री. हरिश्चंद्र काशिनाथ पाटील
मु. बेलाई पो. आग्राव ता. अलिबाग
४. सौ. स्मिता विश्वनाथ कवळे
मु. बेलाई पो. आग्राव ता. अलिबाग

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु ७,५२,७४५/-साठीचा अर्ज.

ज्याअर्थी जय भवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग तर्फे व्यवस्थापक सौ. रेशमा पाटील यांनी दिनांक २८/०८/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ७,५२,७४५/-(अक्षरी रुपये सात लाख बावन्न हजार सातशे पंचेचाळीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २९/०८/२०२४ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक २ ते ४ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २१/१०/२०२४ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक २ व ४ यांना बजाविली गेली नाही. त्यांमुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक १७/१२/२०२४ रोजी दिवसाचे दुपारचे १२.३० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

याकामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक ०६/१२/२०२४
सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

### जाहीर नोटीस

दिनांक : २९ नोव्हेंबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - बोरीवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जगन्नाथ गोविंद म्हसे | ६९ | ५ | १-७२-०० | १ | २५ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २९/११/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र प्रभाकर करळकर व श्री. महेंद्र प्रभाकर करळकर, दोघेही रा. मु. मुशेत, पो.मापगाव, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| मुशेत | ४९/१ | ०-६२-२०<br>पो.ख.०-०८-६०<br>०-७०-८० | १३.९४ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार वारसा हक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ७/१२/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

निवडक

## माणगाव फेस्टिव्हल सुरू

**माणगाव :** माणगावात मुंबई-गोवा महामार्गालगत गांधी मैदान नाणोरे फाटा येथील भव्य मैदानावर ५ डिसेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत धीरूभाई माणगाव फेस्टिव्हलचे आयोजन दररोज सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत दिमाखदार पद्धतीने आकर्षक स्वरूपात करण्यात आले आहे.या फेस्टिव्हलमध्ये एम्युझमेंट पार्क,विविध वस्तूंच्या स्टॉलचा मेळा, खाद्यपदार्थांची लयलूट, गमतीदार खेळांचे स्टॉल्स,दुचाकी व चार चाकी गाड्यांचा लोन मेळा असणार आहे.

## कोट्यवधींची फसवणूक

**पनवेल :** आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगत कारवाई टाळण्यासाठी पैशांची मागणी करून फसवणूक केल्याचा प्रकार नवी मुंबईत घडला. कारवाई टाळायची असेल तर आधी पैसे भरा आणि चौकशी झाल्यावर ते परत मिळतील अशी थाप मारत एका महिलेची तब्बल १ कोटी ३१ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केली. ही घटना ८ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर दरम्यान घडली. फिर्यादी यांनी याबाबत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

## व्याख्यानमालेचे आयोजन

**माणगाव :** टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलजमध्ये भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त प्रा.प्रशांत बोर्डे आणि प्रा.निलकेश धुर्वे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कार्य व कर्तृत्व यावर साविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम हा आय.क्यू.ए.सी. विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. आय.क्यू.ए.सी.प्रमुख अमित बाकाडे यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्राचार्य हर्षल जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शकांचे स्वागत केले.

## पोस्टाचा गलथान कारभार

**नेरळ :** कर्जत पोस्ट कार्यालयाकडून पोस्ट कार्यालयामध्ये विविध कामांसाठी येणाऱ्या ग्राहकांना सेवा मिळत नाही. त्यामुळे पोस्ट कार्यालयाच्या अनागोंदी कामाबद्दल पोस्ट खात्याशी संबंधित असलेल्या रहिवाशानी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान कर्जत पोस्ट कार्यलयाशी संबंधित असलेल्या लोकांनी नवीन पनवेल येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पत्र पाठवूं आपल्या दैनंदिन तक्रारी यांच्याबद्दल निवेदनाद्वारे कळविले आहे.

## एड्स विषयावर कार्यशाळा

**माणगाव :** टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलजमध्ये जागतिक एड्स दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांच्यातर्फे विद्यार्थ्यांकरिता एक कार्यशाळा घेण्यात आली. त्यावेळी एकूण ९० विद्यार्थी व २० शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. रेड रिबन क्लबमार्फत हा दिवस पूर्ण आठवडाभर कॉलजमध्ये साजरा केला जाणार आहे. उपजिल्हा रुग्णालय माणगावच्या संचिता खेडेकर व प्रयोगशाळा तंत्रज्ञ आरती राजपूत यांनी एच.आय.व्ही.एड्स या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

## शहर बचाव समितीचा एल्गार

# कर्जतकरांसाठी उपोषणाचा निर्धार

**। कर्जत । वार्ताहर ।**

**कर्जत नगरपरिषद हद्दीतील समस्या सोडविण्यास नगरपरिषद प्रशासन अपयश आले तसेच त्यांना विचारलेल्या प्रश्नाबाबत समाधानकारक उपाययोजना व उत्तरे न दिल्यामुळे कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने १६ डिसेंबर २०२४ पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात येणार आहे असे निवेदन कर्जत नगरपरिषद प्रशासन देण्यात आले.**




कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने २५ सप्टेंबर २०२४ रोजी नगर परिषद हद्दीतील नागरी समस्यांबाबत निवेदन देण्यात आले होते. त्यामध्ये जी माहिती व समस्या शहर बचाव समितीच्यावतीने मांडण्यात आल्या होत्या.

तसेच दैनंदिन व्यवहारातल्या व आपल्याकडून सहज सुटणाऱ्या होत्या. २८ सप्टेंबरपर्यंत त्याची पूर्तता करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. परंतु आपल्याकडून त्याची काही पूर्तता झाली नाही. तसेच दिलेल्या निवेदनाबाबत मागण्यांबाबत कुठली ठोस समाधानकारक उत्तरे देण्यात आलेली नाहीत,असा आरोप समितीने केला आहे.

- **समस्या सोडवण्यात प्रशासन उदासीन**
- **कर्जत नगर परिषद प्रशासनास समितीने निवेदन केले सादर**

२४ ऑक्टोबर २०२४ रोजी नगरपरिषद प्रशासनास निवेदन तसेच २८ ऑक्टोबर २०२४ रोजी बैठकीत नगर परिषद प्रशासनासमोर मांडणी केलेल्या सर्व समस्यांची निवारण ३० नोव्हेंबर रोजी पर्यंत कराव्या त अन्यथा आम्ही नागरिक यांना जास्त आपल्याविरुद्ध बेमुदत साखळी उपोषण, आंदोलन डिसेंबरच्या पहिल्या हप्त्यात करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता. परंतु दिलेल्या मुदतीत सुद्धा नगरपरिषद प्रशासनाकडून नागरिकांच्या समस्यांचे निवारण झाली नाही.

नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठीचे आश्वासन दिले होते त्याची सुद्धा काही पूर्तता केलेली नाही तसेच नगर परिषदेचे कर्मचारी यांचे नागरिकांच्या समस्या सोडवण्या कामे कुठल्याच प्रकारचे गांभीर्य दिसलेले नाही.

कर्जत नगर परिषदेमध्ये कर्जत शहर बचाव समितीचे कैलास मोरे, सोमनाथ पालकर, शेखर सावंत, सतीश मुसळे, प्रशांत उगले, ॲड.भावना पवार, प्रमिला पाटील, संतोष सावंत, मल्हारी माने, प्रिया नागवडे, अनंता आंग्रे, दिनेश रणदिवे,भीमराव गाडे, गणेश जंगम, सुरेश खानविलकर, जयवंत म्हसे, विजय हरिश्चंद्र, प्रभाकर करंजकर, सूर्यकांत भानुसगरे, अजय वर्धावे, मुजिब मुल्ला, सुनील जाधव यांनी नगरपरिषद प्रशासनास निवेदन दिले आहे.

# विशालच्या प्रामाणिकपणाचे कौतुक





**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील शांतीनगर भागातीलरहिवासी,नागोठण्यातली हायवेनाका येथील हॉटेल विशालचे मालक विलास कांबळे यांचे सुपुत्र तसेच माणगाव येथील केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेचे कर्मचारी विशाल विलास कांबळे यांनी त्यांना सापडलेला ॲपल कंपनीचा महागडा आयफोन नागोठणे पोलिसांकडे रविवारी(दि.१) सकाळी सुपूर्द केला आहे. त्यानंतर नागोठणे पोलिसांनी या आयफोन मोबाईलचा मालक सागर हिंदुराव कणसे, रा. मोरया होम टाऊन, चिकणी- नागोठणे यांना रविवारीच(दि.१) सायंकाळी परत केला आहे.

त्यामुळे विशाल कांबळे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार शनिवारी (दि.३०) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास विशाल कांबळे हे शांतीनगर भागातील त्यांचे शेजारी मिलिंद जांबेकर यांच्या जनरल स्टोअर मध्ये उभे होते.

त्याचवेळी नागोठण्यात येण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्यावर व जांबेकर यांच्या दुकानासमोर एक मोबाईल फोन पडलेला विशाल कांबळे यांना दिसून आला.

त्यानंतर ते फोन उचलल्यास गेले असता फोनवरून वाहने गेल्याने मोबाईल फोनचे काहीसे नुकसान झाले होते. मात्र हा ॲपल कंपनीचा महागडा आयफोन असल्याने तो चालू स्थितीत होता. विशाल कांबळे यांनी सदर मोबाईलवर कुणाचा फोन येत आहे का याची खूप वेळ वाट पाहिली. मात्र सकाळपर्यंत कोणाचाही फोन या मोबाईलवर आला नाही. त्यानंतर विशाल कांबळे यांनी नागोठण्यातील पत्रकार ॲड. महेश पवार यांना नागोठणे पोलीस ठाण्यात सोबत नेऊन सापडलेला हा मोबाईल फोन त्यांनी नागोठणे पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार पो.हे.कॉ.ब्रिजेश भायदे यांच्याकडे सुपूर्द केला. दरम्यान नागोठणे पोलीस ठाण्यातील हे. कॉ. ब्रिजेश भायदे यांच्याजवळ असलेल्या या मोबाईल फोनवर मूळ मालक सागर कणसे यांचा फोन आल्यानंतर ब्रिजेश भायदे यांनी कणसे यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले व मोबाईल फोनची ओळख पटवून तो फोन कणसे यांच्या ताब्यात दिला.

# जीवनविद्या मिशनमध्ये आनंद मेळावा

**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जत वैजनाथ येथे सद्गुरु श्री वामनराव पै यांचे जीवनविद्या मिशन विद्यापीठ आहे. याठिकाणी सध्या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून याठिकाणी काही महान अनुभूती यांना स्वतः संस्थेचे विश्वस्त प्रल्हाद पै यांच्या हस्ते गौरविले जात आहे. याठिकाणी नुकतेच नेरळ येथील माजी उपसरपंच, वृत्तपत्र विक्रेते बल्लाळ जोशी यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे.

समाजसुधारक सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जतमधील जीवनविद्या ज्ञानपीठामध्ये दिनांक २४ ते २९ नोव्हेंबर दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून हजारो शिष्यमंडळी सहभागी झाली होती. २४ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सकाळच्या सत्रात ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ, संगीत जीवनविद्या, दिव्य अनुभूती देणारी मानसपूजा, मानसिक शांतता देणारी शरीरसाधना, कृतज्ञतापूर्वक करण्यात आलेले गुरुपूजन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जीवनविद्या मिशन संस्थेसाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या काही खास लोकांना जीवनविद्या गौरव या पुरस्काराने गौरवण्यात आले. ज्येष्ठ नामधारक दिलीप कुलकर्णी आणि ज्येष्ठ प्रबोधक विश्वनाथ कामत यांना या वर्षीच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. तर यासह नेरळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच, वृत्तपत्र विक्रेते, भजनात हातखंडा असलेले बल्लाळ जोशी यांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला आहे. जीवनात श्री प्रल्हाद पै यांच्या सारख्या अनुभूतींकडून सन्मान होत आशीर्वाद मिळणं हि महत्वाची बाब असल्याचे उद्गार यावेळी जोशी यांनी व्यक्त केले आहेत. दरम्यान याप्रसंगी नेरळ येथील विद्या मंदिर मंडळाचे विवेक पोतदार यांचादेखील सन्मान करण्यात आला.


## दिव्यांग विद्यार्थिनीला व्हीलचेअर भेट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आदिवासी आणि ग्रामीण भागात कार्य करणारी नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट कडून वाकस येथील माध्यमिक विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थिनीला व्हीलचेअरची मदत करण्यात आली. श्री साई ट्रस्टकडून दिव्यांग विद्यार्थी रिया मिसाळ हिला त्यांच्या घरी जाऊन व्हीलचेअर भेट देण्यात आली. कोळीवाली गावात येऊन रिया तानाजी मिसाळ हिची प्रकृती बघून तात्काळ आपल्या संस्थेला व्हील चेअर देण्याबाबत अहवाल सादर केला. त्यानंतर श्री साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले त्यांच्या हस्ते व्हीलचेअर भेट देण्यात आले.

# जासई-न्हावा कॉंक्रिटीकरण ५० टक्के पूर्ण

**। उरण । प्रतिनिधी ।**



सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित येणाऱ्या जासई गव्हाण न्हावा मार्गाचे कॉंक्रिटीकरणाचे काम जवळपास ५० टक्के पूर्ण झाले असून, हा मार्ग खड्डे मुक्त झाला आहे.

उर्वरित काम जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण होईल असे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

सार्वजनिक बांधकाम खाते उरण अंतर्गत असणाऱ्या उरण, जासई, गव्हाण न्हावा मार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अवजड वाहतुकीमुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. वेळीच या मार्गावर डागडुजी न झाल्याने मोठ-मोठे खड्डे निर्माण झाले होते. त्यामुळे अनेक प्रवाशांना या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक झाले होते.

या रस्त्याची डागडुजी व्हावी यासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी तसेच शेकापक्षाचे रमाकांत म्हात्रे यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर त्याची डागडुजी महेंद्र घरात यांनी स्वतः केली होती. हा मार्ग अद्यावत व्हावा यासाठी अनेक वेळा त्यांनी प्रयत्न केले होते. या सर्वांची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या केंद्रीय सडक निधीतून दहा कोटी निधी मंजूर करण्यात आला होता. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होऊन जवळपास ५० अक्के काम ठेकेदारांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहे.

> **हे काम सार्वजनिक बांधकाम खात्याच्या केंद्रीय मार्ग निधी मधून दहा कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. हे काम ठेकेदारांमार्फत सुरू असून, ५० टक्के काम पूर्णही झाले आहे. काम पूर्ण होण्यासाठी मार्च अखेरपर्यंतचा कालावधी आहे. परंतु हे काम आम्ही जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.**
>
> **– कल्पनेश वाडीले**
> **शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते उरण, जासई**

# डाक विभागाचे प्रवीण साळुंखे सेवानिवृत्त

**। सारळ । वार्ताहर ।**



(छायाचित्र : सुरेश खडपे)

डाक विभागासाठी अखंड योगदान देत अलिबाग मुख्य डाकघराचे एसबीसीओ सुपरवायझर प्रवीण साळुंखे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त झाले. त्यांचा सेवानिवृत्ती समारंभ अलिबाग मुख्य पोस्ट ऑफिसच्या परिसरात उत्साहात पार पडला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संजय तळकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डाक अधीक्षक सुनील थळकर, सहा. डाक अधीक्षक (मुख्यालय) राकेश मिश्रा, डेप्यूडी डायरेक्टर जीपीओ सुनील पवार हजर होते. दरम्यान, प्रवीण साळुंखे यांना शाल, श्रीफळ, भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. यावेळी समीर म्हात्रे, मनोज आंबुरे, मिलिंद पाटील, नागेश साखरकर, सुरेश खडपे, गिरीश जोशी, रवींद्र घरत, किशोर नाखवा, प्रकाश पाटील, प्रशांत दळवी, विकास पोतदार, प्रशांत नारवेकर, यांनी त्यांच्या सोबतीतील काही अनुभव याप्रसंगी कथन केले.

# सीआयएसएफ जवानांकडून मारहाण

**। पनवेल । वार्ताहर ।**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांकडून खारघरमध्ये एका डॉक्टरसह त्यांच्या कुटुंबियांना बेदम मारहाण झाली आहे. पोलिसांनी १० ते १५ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांविरोधात मारहाणी केल्याचा गुन्हा नोंदविला आहे.

शुक्रवारी रात्री जवानांच्या चार बसगाड्या रस्त्यावरुन जात असताना सीआयएसएफ जवानांच्या एका बसगाडीला डॉ. श्रीनाथ परब यांच्या वाहनांनी दाबले. जवानांची बसगाडी का दाबली याचा जाब विचारण्यासाठी डॉ. श्रीनाथ यांचे वाहन थांबविण्यात आले. दोनशे जवान असलेल्या बसगाड्या थांबल्यामुळे किमान दोनशे जवान रस्त्यावर उतरले. मात्र त्यापैकी १५ जवानांनी डॉ. श्रीनाथ यांच्यासह सर्वांनाच मारहाण केली.

# भास्कर पाटील यांचे निधन

**। अलिबाग । वार्ताहर ।**



अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील समाजाभिमुख, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले आजातशत्रू भास्कर गणपत पाटील (बी. जी.पाटील) यांचे रविवारी (दि. १) दीर्घ आजाराने निधन झाले. निधनसमयी ते ८६ वर्षांचे होते.

मेढेखारमधील सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यमंडळ, कबड्डी या क्षेत्रामध्ये ते अग्रणी असायचे. विकास क्रीडा मंडळाचे ते चिटणीस होते. त्यांनी प्राणाचं दान, प्रेमाचा सौदा, माणुसकी, आई तुला कशी म्हणून मी, सरनोबत, उंबरठ्यावरी माप ठेविते अशा नाटकांतून उत्तम कलाकार म्हणून भूमिका वठवल्या होत्या. ते रायगड जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम खात्यात नोकरी करुन सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी इंदूमती, मुलगे सुशील व मनोज, दोन मुली, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

कै. भास्कर पाटील यांच्या पार्थिवावर मेढेखार येथील वैकुंठभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशितील मोठा जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. १०) रोजी, तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि. १३) त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कुटुंबियांनी दिली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- इलेक्ट्रिशन पाहिजे ३ ते ४ वर्षाचा अनुभव. संपर्क : ८८८८६०५२५९
- डिझेल रिट्स गाडी विकणे आहे मॉडेल-२०११ एस ई किट पूर्ण नवीन ॲव्हरेज २१ ते २२ कि.मी. टायर बॅटरी नवीन विमा पॉलिसी मे २०२५ पर्यंत किंमत रू. २.०० लाख No-Agent Syteam मो.९९२१६४४१४४
- ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. ३ बेडरूम, ३ बाथरूम, किचन, हॉल, रॉयल मोटार जवळ अलिबाग, ९९७५४९०१६४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

# कर्जत कल्याण शटल सेवा सुरू करावी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**मध्य रेल्वेचे मेन लाईन वरील मुंबई पुणे मार्गावरील कर्जत दिशेकडे जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी कल्याण ते कर्जत अशी शटल सेवा सुरू करावी अशी मागणी करण्यात आली आहे.**

नेरळ रेल्वे प्रवासी संघटना यांच्या माध्यमातून या मागणीचे निवेदन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना देण्यात आले आहे. दरम्यान, कर्जत आणि नेरळ जंक्शन या दोन रेल्वे स्थानकाची नामकरण कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील असे करावीत अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

मध्य रेल्वेचे मेन लाईनवर कर्जत दिशेकडे प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवासी, महिला प्रवासी आणि विद्यार्थी यांना मोठी कसरत करावी लागते. कर्जत येथून मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कडे जाणाऱ्या उपनगरीय लोकल या सकाळच्या वेळी कामगार वर्गाच्या गर्दीमुळे खचाखच भरलेल्या असतात.

त्यामुळे नेहमी प्रवास करीत नसलेल्या प्रवाशांना मोठी कसरत करावी लागते. त्यात वांगणी, शेलू, नेरळ आणि भिवपुरी तसेच कर्जत, खोपोली भागात नव्याने मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. मुंबईचे उपनगर म्हणून या सर्व स्थानकाच्या परिसरात वाढलेली लोकसंख्या लक्षात घेवून उपनगरीय लोकल यांची संख्या वाढणे आवश्यक झाले आहे. मात्र मागील १५वर्षात एकही नवीन लोकल कर्जत साठी वाढलेली नाही. मात्र लोकसंख्या मागील १५वर्षाच्या तुलनेत तिप्पट झाली आहे. यासर्व बाबींचा मध्य रेल्वेचे प्रशासनाने विचार करून कर्जत लोकलची संख्या वाढवणे अत्यंत गरजेचे होते.मुंबईचे उपनगर म्हणून विकसित झालेल्या कर्जत येथून रात्री पावणे अकरा नंतर एकही उपनगरीय लोकल मुंबई साठी सोडली जात नाही.रात्री अकरा पासून पहाटे अडीच पर्यंत कर्जत येथून मुंबई कडे जाणारी एकही लोकल नाही.




### स्थानकांचे नामकरण करा

**कर्जत तालुक्याला देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास असून या तालुक्यातील बॅरिस्टर विठ्ठलराव तथा भाई कोतवाल आणि हिराजी गोमाजी पाटील हे हुतात्मा झाले.या दोन्ही हुतात्म्यांची नावे कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकात द्यावी अशी अनेक वर्षापासूनची मागणी आहे.नेरळ प्रवासी संघटनेचे वतीने रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिलेल्या निवेदनात कर्जत स्थानकाच्या हुतात्मा भाई कोतवाल रोड स्थानक तर नेरळ जंक्शन स्थानकाचे हुतात्मा हिराजी पाटील रोड स्थानक असे नाव देण्यात यावे अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. घेत आहे.**

www.krushival.in | कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# गिर्यारोहकांचं काम सोपं

जगातल्या सर्वात उंच शिखरावर म्हणजे माऊंट एव्हरेस्टवर चढाई करणाऱ्यांची संख्या वाढतीये ना? सतत कोणी ना कोणी एव्हरेस्ट सर केल्याच्या बातम्या येतच असतात. आपल्याला प्रश्न पडतो ना? इतक्या उंचावर पाठीवर जडजाळ ओझं घेऊन बर्फ तुडवता आणि थंडगार वाऱ्याचा सामना करत कसं बरं चढत असतील हे लोक? पण मित्रांनो आता पूर्वीची गैरसोय राहिलेली नाही. त्यांची चढाई सोपी करणारी अनेक साधनं उपलब्ध आहेत. गिर्यारोहक वापरतात ते बुट खूप स्पेशल असतात. सुरुवातीला फारसे चांगले बुट नसल्यामुळे गिर्यारोहकांचे पाय जायबंदी व्हायचे. पण आता त्यांच्यासाठी थ्री लेअर्ड शूज असतात. हे बूट वजनाला हलके आणि वेदरप्रुफ असतात. म्हणून थंडगार वारं असलं तरी पाय गरम राहतात. त्यांची बर्फावरील पकडही अत्यंत मजबूत असते. स्टील आणि ॲल्युमिनियमचा वापर केल्यामुळे ते भलतेच दणकट असतात. गिर्यारोहक वापरतात ते जॅकेटही वैशिष्ट्यपूर्ण असतं. बाहेरच वातावरण उणे ४० अंश असलं तरी जॅकेटमुळे शरीराचं तापमान सुयोग्य राखलं जातं. वॉटरप्रुफ असल्यामुळे कितीही बर्फ पडत असला तरी गिर्यारोहक भिजत नाहीत. सतत प्रखर सूर्यप्रकाशात असल्यानं गिर्यारोहकांना अल्ट्रा व्हायलेट किरणांना धोका असतो. पण हा धोका टाळण्यासाठी त्यांच्याकडे पॉवरफुल सनस्क्रिन लोशन असतं. त्याचप्रमाणे या किरणांपासून वाचण्यासाठी विशिष्ट कॅपही असते. त्यांच्या स्लिपिंग बॅग्ज हलक्या होताहेत. जेवण बनवण्यासाठी वापरण्यात येणारे सिलेंडर हलके होताहेत. ऑक्सिजन सिलेंडरसुद्धा हलके होताहेत. धातूऐवजी फायबरचा वापर होतोय. या सगळ्यामुळे गिर्यारोहकांची निश्चितच सोय होतीये.



# सुंदर किर्गिझस्तान

सफर देशांची

किर्गिझस्तान हा मध्य आशियातला एका देश. चीन आणि कझाकिस्तान या दोन देशांच्यामध्ये तो वसला आहे. किर्गिझस्तान निसर्गसौंदर्याने नटलेला देश आहे. 'किर्गिझ रिपब्लिक' या नावाने तो ओळखला जायचा. या देशाला 'किर्गिझिया' असंही म्हटलं जातं. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या किर्गिझस्तानमध्ये बऱ्याच डोंगररांगा आहेत. चीन, कझाकिस्तानसह तजिकिस्तान आणि उझबेकिस्तान हे सुद्धा किर्गिझस्तानचे शेजारी आहेत. 'बिश्केक' ही या देशाची राजधानी. एके काळी हा सोव्हिएत रशियाचा भाग होता. १९९१ मध्ये तो स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. १९९० च्या दशकात या देशात खूप शांतता होती. मात्र नंतर इथे राजकीय गोंधळ सुरू झाला.

किर्गिझस्तान जगातल्या कोणत्याही देशापेक्षा महासागरापासून सर्वाधिक लांब असून देशातला ८० टक्के भाग डोंगराळ आहे. 'इसिक कुल' हा किर्गिझस्तानमधलाच नाही तर आशिया खंडातल्या पर्वतरांगांमधला सर्वात मोठा तलाव आहे. 'टिटिकाका' हा जगातला पर्वतरांगांमधला सर्वात मोठा तलाव असून 'इसिक कुल'चा दुसरा क्रमांक लागतो. किर्गिझस्तान निसर्गसौंदर्याने समृद्ध असला तरी मध्य आशियातला दुसऱ्या क्रमांकाचा गरीब देश आहे. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय. इथले शेतकरी हातांनी शेती करतात. आपल्याकडे शेतीसाठी बैलांचा वापर होतो तर त्या देशात घोडे शेतात राबताना दिसतात.



गहू, बटाटे, कापूस, तंबाखू, भाज्या, फळं इथं पिकवली जातात. इथं खनिजसंपत्तीही आहे. या देशात कोळसा, सोनं, युरेनियमच्या खाणी आहेत. किर्गिज आणि रशियन या इथल्या अधिकृत भाषा आहेत. वेगवेगळ्या जमातींचे लोक या देशात राहतात.

# आकर्षक व्यक्तिमत्त्वासाठी...

व्यक्तिमत्त्व विकास

छोट्यांनो, आपण आपलं व्यक्तिमत्त्व नीट घडवायला हवं. लोकांना स्वत:कडे आकर्षित करायला हवं. इतरांनी आपल्याशी बोलायला हवं असेल तर स्वत:मध्ये काही बदल घडवायला हवेत. आकर्षक व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी काय करायला हवं याविषयी...



✻ लोकांशी नम्रपणे बोला. उगाचच उद्धटपणा किंवा आगाऊपणा करू नका. कुठे कसं वागायचं याची जाण असायला हवी. आपले मित्रमंडळी, कुटुंबिय, शेजारी सगळ्यांशी गोड बोला. भांडखोर, चिडचिड करणारी मुलं लोकांना आवडत नाहीत.

✻ हजरजबाबीपणा हा खूप चांगला गुण आहे. यामुळे लोक तुमच्याकडे आकर्षित होतात. हा गुण विकसित करण्याचा प्रयत्न करा. आपल्याला विचारलेल्या प्रश्नाचं लगेच उत्तर देता आलं पाहिजे. हजरजबाबी माणूस वातावरणातला ताण लगेच दूर करतो. अशी माणसं हवीहवीशी वाटतात.

✻ नेहमी आनंदी राहा. सगळ्यांशी मोकळेपणाने बोला. हसतमुख, आनंदी माणसं सर्वांना प्रिय असतात.

✻ आपल्या दिसण्याकडेही लक्ष द्यायला हवं. बरीच लहान मुलं शरीराच्या स्वच्छतेची काळजी घेत नाहीत. केस वेळेत कापत नाहीत. नखं कापायला टाळाटाळ करतात. यामुळे आपण चांगले दिसत नाही. त्यामुळे स्वच्छ कपडे घाला. लोकांशी आत्मविश्वासाने बोला. घाबरून जाऊ नका. ताठ चाला. नियमित व्यायाम करा.

या बदलांचा तुम्हाला भविष्यात खूप फायदा होईल. म्हणूनच आपलं व्यक्तिमत्त्व घडवायला आत्तापासूनच सुरूवात करा.

# मेजवानी खमंग शेंगदा याची

वेचक वेधक

झकास थंडी पडलीये. अधून मधून ढगाळ वातावरण असलं तरी सकाळी आणि संध्याकाळी छान गारवा पडलाय. या दिवसात गरमागरम पदार्थ खाण्याची मजाच काही वेगळी आहे. आईनं केलेली गरमागरम कढी असो, स्टार्टर्सबरोबर घेतलेलं गरमागरम सूप असो अथवा एखादा कढण असो. थंडीत या सगळ्याची मजाच काही वेगळी. भुईमुगाच्या उकडलेल्या गरमागरम शेंगा या देखील अगदी चविष्ट लागतात. मीठ घालून उकडलेल्या या शेंगा कितीही खाल्ल्या तरी कंटाळा येत नाही. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे शेंगदाण्यामध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म असतात त्यामुळे या दिवसात शेंगदाणे खायलाच हवेत. मग ते शेंगामधले ओले दाणे असोत अथवा आपण नेहमी वापरतो ते शेंगदाणे असोत. शंभर ग्रॅम शेंगदाण्यामध्ये किती पोषणमुल्य असतं बघायचंय? यात ५६७ कॅलरीज, ४९ ग्रॅम फॅट्स, १८ मिलीग्रॅम सोडियम, १८ मिलीग्रम पोटॅशियम, कार्बोहायड्रेट्स, व्हिटॅमिन्स, प्रोटीन, फायबर असतं. शेंगदाण्यात व्हिटॅमिन बी३ची पर्याप्त मात्र असते म्हणूनच स्मरणशक्ती वाढवण्यासाठी शेंगदाणे उपयुक्त ठरतात. तुम्ही आई नसताना चोरून शेंगदाणे खात असालच त्यातल्या त्यात खारे शेंगदाणे करून ठेवले असतील तर डबा संपायला १ दिवसही पुरत असेल. पण मित्रांनो 'अति तिथे माती' हे तुम्हाल माहीत असेलच. शेंगदाण्याचे फायदे मिळवायचे असतील तर मुठभर शेंगदाणे रात्री भिजत घाला आणि सकाळी उठल्यावर खाऊन टाका. यात नियमितता ठेवा. असं केल्यानं बुद्धीही वाढेल आणि शक्तीही वाढेल.



दोस्त हे मस्त

## असे आहेत 'हंपबॅक डॉल्फिन'




मुंबईतल्या वांद्रे-वरळी सी लिंकजवळच्या समुद्रात 'हंपबॅक डॉल्फिन' आढळले. हे मध्यम आणि लहान आकाराचे जलचर आहेत. श्वास घेण्यासाठी त्यांना सारखं पाण्याबाहेर यावं लागतं. म्हणूनच डॉल्फिन अगदी सहज दिसतात. 'हंपबॅक डॉल्फिन' महाराष्ट्रात रत्नागिरी आणि सिंधुदुर्गातल्या समुद्रात आढळतात. डॉल्फिनच्या इतर प्रजातींप्रमाणेच 'हंपबॅक डॉल्फिन'ही समूहाने राहतात. हे डॉल्फिन पाण्याबाहेर २० फूट उंच उडी मारू शकतात.

खादाडी

## गरमागरम 'बेक्ड पोटॅटो'

छोट्यांनो, काही तरी वेगळं पण चविष्ट खावंसं वाटत असेल तर 'बेक्ड पोटॅटो' करून बघा. यासाठी अर्धा कप दही, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, चमचाभर बेसन, एक बारीक चिरलेली हिरवी मिरची, दोन चमचे बटर, दोन मोठ्या आकाराचे बटाटे, दोन चमचे चीज, मीठ हे साहित्य घ्या. मोठ्या भांड्यात दही, क्रीम, आलं-लसूण पेस्ट, बेसन, मीठ आणि हिरवी मिरची घालून सगळे घटक नीट मिसळून घ्या. मधून कापून बटाट्याचे दोन तुकडे करा. बेकिंग ट्रेच्या तळाला बटर लावून घ्या. बटाट्यांच्या कापांवर आधी तयार केलेलं मिश्रण घाला. त्यावर चीज घाला. बटाटे ट्रेमध्ये ठेवा. आता मायक्रोवेव्हमध्ये १८० अंश सेल्सियसवर १० मिनिटं बेक करून घ्या 'बेक्ड पॉटेटो' तयार होतील. सॉससोबत खा.



एक्झॅम टाईम

## दूर करा परीक्षेचा ताण

परीक्षेचा आपल्याला खूप ताण येतो. पेपर हातात येईपर्यंत चैन पडत नाही. अशा वेळी काही गोष्टी केल्याने हा ताण कमी होऊ शकतो. परीक्षेच्या दिवसात घाईमुळे तुम्ही बस किंवा रिक्षाने शाळेत जाता. त्याऐवजी सायकल चालवा. सकाळी शक्य नसेल तर संध्याकाळी सायकलवरून एखादा फेरफटका मारा. जेवताना गाणी ऐका. भरपूर अभ्यास केल्यावर मित्र किंवा मैत्रिणीला फोन करा. निवांत गप्पा मारा. घरात बाग असेल तर तिथे थोडा वेळ घालवा. यामुळे तुमच्या मनावरचा सगळा ताण दूर होईल आणि पेपर नीट लिहिता येईल.



योगा टाईम

## चालू नका... धावा

दोस्तांनो, चालणं हा सर्वात सोपा व्यायाम आहे. पण चालण्यापेक्षाही धावण्याचे जास्त फायदे असतात. धावल्यामुळे जास्त कॅलरी खर्च होतात. त्यामुळे तुम्हीही बागेत धावायला जा. तुम्ही लहान मुलं खूप चपळ असतात. लहानपणापासून व्यायाम सुरू केला तर तुमचं आरोग्य उत्तम राहील.






जिज्ञासा

## ओळखा पाहू

१) सप्तश्रृंग शिखर कोणत्या जिल्ह्यात आहे?
२) भारतातला सर्वात मोठा गोलघुमट कुठे आहे?
३) भारतीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष कोण?
४) इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला कोण?
५) वर्षातला सर्वात मोठा दिवस कोणत्या तारखेला असतो?
६) झेक प्रजासत्ताकची राजधानी कोणती?
७) दुधापासून दही होण्याच्या प्रक्रियेला शास्त्रीय भाषेत काय म्हणतात?
८) विद्युतप्रवाह कोणत्या परिमाणाने मोजतात?
९) देवी या रोगाची लस कोणत्या शास्त्रज्ञाने शोधून काढली?
१०) प्रसिद्ध जगन्नाथ मंदिर कुठे आहे?

उत्तरं : १) नाशिक २) विजापूर ३) व्योमेशचंद्र बॅनर्जी ४) आरती शहा ५) २१ मार्च ६) प्राग ७) जैवरासायनिक प्रक्रिया ८) ॲम्पियर ९) एडवर्ड जेन्नर १०) पुरी.

# चमकिल्या दातांसाठी...

स्टे फिट


मित्रांनो, माणसाला आयुष्यात दोनदाच दात येतात. एकदा दुधाचे दात पडतात आणि नवीन दात येतात. पण हे दात पडले की पुन्हा कधीच नैसर्गिकरित्या दात उगवत नाहीत. म्हणूनच आत्तापासूनच दातांचं आरोग्य जपायला हवं. यासाठी काही चांगल्या सवयी लावून घेऊ या. आईनं कितीही सांगितलं तरी किती जणं दिवसातून दोन वेळा दात घासतात? कंटाळा येतो ना! पण मित्रांनो, दातांचं आरोग्य जपण्यासाठी दोनदा ब्रश करायलाचं हवं. अगदी कंटाळा न करता! सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपताना ब्रश केल्यानं दात स्वच्छ राहतात आणि किडण्याचा धोका कमी होतो. नाष्टा केल्यावर, चहा-कॉफी घेतल्यावर किंवा काहीही खाल्ल्यावर चूळ भरायला विसरू नका. शाळेमध्येदेखील हे पथ्य पाळा. यामुळे तोंड स्वच्छ राहून दातांचं आयुष्य वाढतं. आपल्या सगळ्यांनाच फास्ट फूड आवडतं, चॉकलेट ड्रिंक आवडतं, कॅडबरी आवडते. पण हे सगळे पदार्थ दातांसाठी घातक आहेत. यामध्ये साखरेचा अमाप वापर केलेला असतो. शिवाय हे पदार्थ टिकण्यासाठी भरपूर प्रिझर्व्हेटिव्हस घातलेले असतात. साहजिकच हे पदार्थ दात कमकुवत बनवतात. म्हणूनच ते कमीत कमी खाऊ या. दात किडू नयेत म्हणून एक विशिष्ट प्रकारचं कोटिंग करता येतं. त्याला सिलेंट कोटिंग म्हणतात. या आवरण्यामुळे जंतूसंसर्ग टळतो आणि दात सुरक्षित राहतात. तेव्हा हे ही करायला हरकत नाही. तुमच्याकडे माऊथ वॉश असेलच पण झणझणतं म्हणून तुम्ही तो वापरत नसाल. पण या माऊथवॉशमध्येच किटाणू दूर करण्याची शक्ती आहे. तेव्हा ब्रशनंतर त्याचा वापर करा. मग बघा तुमचे दात कसे स्वच्छ राहतात ते.



# उचलू या खारीचा वाटा

वाचा तर खरं

मित्रांनो, सध्या प्रदूषण वाढते आहे हे तुम्ही जाणताच. पृथ्वीचं तापमान वाढतंय. त्यामुळेच वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलांचं प्रमाण कमी होतंय. बेसुमार जंगलतोडीमुळे पाऊस कमी होऊन नद्या नाले आटताहेत. या वाढत्या प्रदूषणाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी २ डिसेंबर नॅशनल पोल्युशन कंट्रोल म्हणून पाळला जातो. आपणही या निमित्तानं प्रदूषण कमी करण्यासाठी हातभार लावायला हवा. तुम्हाला माहिती आहे दर वर्षी १४ अब्ज टन कचरा समुद्रात फेकला जातो. या कचऱ्यातील सर्वाधिक भाग घातक असणाऱ्या प्लॅस्टीकचा असतो. पाण्यामधील या वाढत्या प्रदूषणामुळे दर वर्षी एक लाखाहून अधिक समुद्री पक्षी आणि एक लाखाहून अधिक समुद्री स्तनधारी यांचं जीवन धोक्यात येतं. किंबहुना यातील बऱ्याच जणांचा जीव जातो. वेगवेगळ्या उद्योगधंद्यांच्या मार्फत तयार होणारी घातक रसायनं जलस्त्रोतात मिसळतात आणि हे पाणी पिण्यास अयोग्य ठरतं. चीन हा देश कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित करणारा सर्वात मोठा देश आहे. तेथील व्यापार उद्योगांमध्ये झालेलं मोठ्या प्रमाणावरील यांत्रिकीकरण कार्बन डाय ऑक्साईडच्या उत्सर्जनास कारणीभूत ठरतं. त्यानंतर नंबर लागतो अमेरिकेचा. इथेही प्रदूषणाचा स्तर मोठा आहे. नासा एक अंतराळ यान प्रक्षेपित करतं तेव्हा अंदाजे २८ टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित होतो. आता हे सगळं लक्षात घेता प्रदूषण ही समस्या किती मोठी आहे हे लक्षात येईलच. तेव्हा प्रदूषण करण्यासाठी आपण खारीचा वाटा उचलायला हवा. काय करू शकतो आपण? घरातला टी.व्ही अथवा म्युझिक सिस्टीमचा आवाज कमी ठेवू या, घरात तयार होणारा कचरा कचरा पेटीतच टाकू या, ओढे, नाले, तलाव, नदी आदी जलस्त्रोतात कधीही कचरा टाकायचा नाही आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्लॅस्टिकचा वापर कमीत कमी करू या. पहा बरं, आपल्या सर्वांच्या प्रयत्नानं वाढतं प्रदूषण नक्कीच नियंत्रणात येईल.



# प्लेसमेंटच्या पलीकडे

करिअर टिप्स

कॅम्पस प्लेसमेंटला सध्या बरंच महत्त्व आलं आहे. हुशार मुलामुलींची कॉलेजच्या कॅम्पसमध्येच मुलाखत घेतली जाते. याद्वारे चांगली नोकरीही मिळते. पदवीनंतर किंवा इंजिअरींग, एमबीएचे अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटचं आयोजन केलं जातं. जगभरातल्या कंपन्या इथे येतात. योग्य उमेदवाराची निवड करतात. पदवी मिळवल्यानंतर बरेच विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंटवर अवलंबून राहतात. तुम्हीही पुढे हा मार्ग पत्करू शकता. किंवा तुमच्यामध्ये प्रचंड क्षमता असेल तर कॅम्पस प्लेसमेंटच्या बाहेरही संधी शोधता येईल.



पहिल्या नोकरीसाठी स्टार्टअप किंवा मोठ्या कंपनीचा विचार करत असाल तर एखाद्या नावाजलेल्या कंपनीला प्राधान्य द्या. मोठ्या कंपनीत संधीही चांगल्या मिळतात. इथे तुम्ही तुमची कौशल्यं विकसित करू शकता. भविष्यात चांगल्या संधी मिळवण्यासाठी मोठ्या कंपनीतली नोकरी उपयुक्त ठरू शकते.

एखाद्या विषयाची आवड असेल तर संबंधित प्राध्यापकांना भेटा. बऱ्याच प्राध्यापकांना इतर कामांसाठी मदत हवी असते. ही मदत तुम्ही करू शकता. यामुळे तुम्हाला बराच अनुभव मिळेल. तरुण मुलं मोठ्या शहरांकडे आकर्षित होतात. पण मुलांनो, छोट्या शहरांमध्येही तुम्हाला बऱ्याच संधी मिळतात. इथे स्पर्धा कमी असल्यामुळे लवकर नोकरी मिळते. त्यामुळे लगेच मोठ्या शहराकडे धाव घेऊ नका. कॉलेजच्या नोटीस बोर्डकडे नेहमी लक्ष ठेवा. इथे नोकरीच्या संधींची माहिती दिलेली असते. तसंच प्लेसमेंट कधी होणार याबाबतही सांगितलं जातं. त्यामुळे कॉलेजमध्ये नेहमी जागरूक राहा. या गोष्टींकडे लक्ष दिलं तर करीअरच्या सुरूवातीलाच चांगली नोकरी मिळू शकेल.

## ठिपके जुळवा



# कलासक्त

**तीन पिढ्यांपासून प्रेक्षकांच्या मनावर रघुवीर कुटुंबियांनी जादूची मोहिनी घातली आहे. या तीन पिढ्यांनी गेल्या ८० वर्षांमध्ये विविध २९ देशांमध्ये १६ हजारांहून अधिक प्रयोग केले आहेत. याच कुटुंबांतील तिसऱ्या पिढीतील जादूगार जितेंद्र रघुवीर यांचे जादूचे प्रयोग अलिबागमध्ये होणार आहेत.**

## जादूच्या दुनियेतील रघुवीर

प्रमोद जाधव





'जादूगार रघुवीर' हे नाव घेतलं की येणारा प्रतिसाद फारच चांगला असतो. त्याचं कारणही तसंच आहे. त्यांनी आपले सगळे आयुष्य 'जादू' या कलेच्या संवर्धनासाठीच समर्पित केले होते. आपले तन मन धन त्यांनी जादू या कलेसाठी वाहून घेतले. जादू ही एक कला आहे. त्याचा खरे तर उगम हा भारतात झालेला आहे. पाश्चिमात्यांनी त्यात अधिक मूल्यवर्धन केले. पण भारतात जादू या कलेला तंत्रमंत्राचा मुलामा चढवला गेला. त्यातून रघुवीर कुटुंबियांनी लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. जादूचे प्रयोग हा आबालवृद्धांच्या उत्सुकतेचा विषय असतो. जादूगार जितेंद्र रघुवीर हे या मंडळींना आपल्या जादूने खिळवून ठेवण्याचे काम केले आहे. डोळे बांधून रस्त्यावर मोटारसायकल चालविणे, स्वप्नसृष्टी, नोटांचा पाऊस, हातातून वीजनिर्मिती, भुतांचा नाच इत्यादी प्रयोग करणारे जादूगार जितेंद्र रघुवीर म्हणजे अवलियाच.

जादूच्या कलेमुळे जगभरातील २९ देशांचा त्यांनी आजवर प्रवास केला आहे. आपल्या आयुष्यात त्यांनी १६ हजारांहून अधिक प्रयोग केले. जादू हा तंत्रमंत्र नाही तर ती हातचलाखी आहे, हे ठसवताना त्यांनी प्रयोगांच्या माध्यमातून जनजागरण केले. ३६५ दिवसांत ११० प्रयोग व तेही हाउसफुल, असे विक्रम त्यांच्या नावावर आहेत. अनेक गावांतील मंदिरे, शाळा, हॉल, तालमीच्या बांधकामांसाठी निधी मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले कार्यक्रम फुकट दिले. त्यांच्या जादूचे आकर्षण कायम राहिले. त्यांनीही साधी, सोपी उदाहरणे, साधी, सोपी भाषा यातून त्यांनी जादूचे खेळ चालू ठेवले आहेत. जादू हा चमत्कार नाही ती हातचलाखी आहे, असे जाहीर करूनच ते खेळाला सुरुवात करतात. हातचलाखी इतकी जबरदस्त, की लोक त्यांना मांत्रिक-तांत्रिकच समजतात, भेटून आपल्या खासगी अडचणी सांगतात. परंतु, जितेंद्र रघुवीरांनी जनजागृतीच्या माध्यमातून जादू ही हातचलाखीच असल्याचे सांगितले.

जादू या कलेला छोट्यापासून मोठ्या रंगमंचावर सादर करण्याचे आव्हान जितेंद्र यांनी यशस्वीपणे पेलले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जादूगार म्हणून कीर्ती मिळविली. निखळ करमणूक हे सूत्र ठेवून रघुवीर कुटुंबियांनी अनेक वर्षे आबालवृद्धांवर अक्षरशः जादू केली. निरनिराळ्या शाळांतून जादूविद्येवर व्याख्याने देऊन त्यांनी तिचा प्रचार केला. भारतीय जादूगारपरिषद, ऑस्ट्रेलियन गव्हर्नमेंट, अमेरिकन नेव्ही, युनाइटेड नेशन्स आदींकडून रघुवीर कुटुंबियांचा गौरव करण्यात आला आहे.

बदलत्या काळानुसार वेगवेगळ्या क्षेत्रात अमुलाग्र बदल कायमच होत आले आहे. मनोरंजाचे साधन म्हणून असलेल्या जादूच्या प्रयोगामध्येदेखील प्रचंड बदल होत असल्याचे पहावयास मिळत आहे. आवडीनुसार होणाऱ्या या प्रयोगामुळे नवी पिढीही जादूच्या प्रेमात पडली आहे. पुर्वी काही विशिष्ट जादूगार मोठ्या शहरामध्ये जादूचे प्रयोग करत होते. परंतु प्रसिध्द जादूगार जितेंद्र रघुवीर यांच्या आजोबांनी गावागावात जादूचे प्रयोग करून तळागाळातील घटकाला जादूचे प्रयोग पाहण्याचा आनंद दिला. त्यानंतर जितेंद्र रघुवीर यांच्या वडीलांनीदेखील हीच परंपरा कायम ठेवली. गावागावात जादूगार रघुवीर पोहचले होते. युरोप, अमेरिकेतील मुले त्यांच्याकडे जादूचे प्रयोग शिकण्यासाठी येत होते. अनेक परदेशात जादूचे प्रयोग केले. वयाच्या पाचव्या वर्षापासून जितेंद्र रघुवीर यांनी जादूचे प्रयोग शिकण्यास सुरुवात केली. आजोबा, वडिलांकडून मिळालेला जादूच्या प्रयोगाचा वारसा जितेंद्र रघुवीर यांनी जपून ठेवला आहे. त्यांचा मुलगादेखील जादुचे प्रयोग करीत आहे.

आपल्या आजोबांकडून जादूगारचा वारसा घेत जितेंद्र रघुवीर यांनी आतापर्यंत १६ हजारहून अधिक प्रयोग केले आहेत. जादूबद्दल असलेले गैरसमज, अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न जितेंद्र रघुवीर यांच्या आजोबांपासून वडिलांनी व त्यांनी केला आहे. जादूमधील वैज्ञानिक दृष्टीकोन जनतेमध्ये निर्माण करण्याचा कायमच त्यांनी प्रयत्न केला आहे. एमएस मॅकेनिकलचे शिक्षण घेतलेले जितेंद्र रघुवीर यांनी २९ देशांमध्ये जादूचे प्रयोग केले आहे. जादूचे प्रयोग करणाऱ्या चौथ्या पिढीने अनेक देशात जादूचे प्रयोग करून विक्रम केला आहे.

जादूचे प्रयोग पाहण्यासाठी पिढीजात प्रेम मिळाले आहे. त्यामुळे जितेंद्र रघुवीर यांचे जादूचे प्रयोग फक्त गावापुरता, शहरापूरता मर्यादीत नसून जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचले आहे. जादूचे प्रयोग जादूटोणा नसून तंत्रज्ञान व हातचलाखीवर चालणारा हा खेळ आहे. एक मनोरंजनाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. या प्रयोगातून रसिकांच्या मनात एक आनंद ठेवण्याचा प्रयत्न राहिला आहे. जादुला विज्ञानाचा भक्कम पाया आहे. कोणत्याही अंधश्रध्देला खतपाणी घालण्याचे काम केले जात नाही. ●●

### नवी पिढी रमली जादुच्या दुनियेत

जादूचे प्रयोग शिकण्यासाठी मोबाईल मध्ये रमणारी पिढीदेखील पुढे येऊ लागली आहे. दहा वर्षापासून पुढील वयोगटातील मंडळी हे प्रयोग शिकण्यासाठी येतात. बदलत्या काळानुसार जादूच्या प्रयोगांमध्ये आमुलाग्र बदल करण्यात आले आहे. सोशल मिडीयावर रमणाऱ्या पिढीला जादूच्या प्रयोगातून प्रत्यक्षात अनुभव घेण्याची संधी उपलब्ध केली जात आहे.

### दोन दिवस दोन शो

होम मिनिस्टर, सुर नवा ध्यास नवा, कॉमेडी एक्सप्रेस, माझा कट्टा, खाली डोकं वर पाय, आम्ही सारे खवय्ये, खुपते तिथे गुप्ते आणि चला हवा येऊ द्या वर गाजलेल्या जादू आणि परदेशातून आणलेले खास नवीन जादूचे प्रयोग बघण्याची सुवर्णसंधी शनिवारी दिनांक ७ डिसेंबर आणि रविवारी ८ डिसेंबर रोजी मिळणार आहे. दोन दिवस दोन शोज होणार आहेत.



## ५५ वा आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव

शरद कोरडे

गोव्यामध्ये दिनांक २२ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवाचा समारोपाचा समारंभ गोव्यातील डॉ. शामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये २८ नोव्हेंबर रोजी एका शानदार व रंगतदार सोहळ्याने झाला. या कार्यक्रमातील सिनेमाची जादू आणि कथात्मक मांडणीची अतिव ओढ व कौशल्य यांची न पुसणारी छाप रसिकांच्या मनावर ठेवूनच हा महोत्सव संपला. प्रेक्षक आणि चित्रपट निर्मिती क्षेत्रातील भविष्यातील उदयोन्मुख व्यक्तिमत्त्वांसाठी या क्षेत्रातील अनेक दरवाजे उघडण्यात आले होते. यावर्षी झालेल्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवात सुमारे ११,३३२ प्रतिनिधी सहभागी झाले होते. हे प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत खूपच वाढले होते. या महोत्सवात भारतातील ३४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामधील आलेल्या प्रतिनीधींसह वेगवेगळ्या २८ देशांमधील प्रतिनिधी सहभागी झाले होते.

यावर्षीच्या 'फिल्म बाजार' या नवोदित दिग्दर्शक व कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी व चित्रपट निर्मितीतील देशविदेशात प्रसारणाची संधी उपलब्ध करून उद्योगशील करण्याचा जो उपक्रम घेण्यात आला त्यात येणाऱ्या प्रतिनिधींचीही संख्या कमालीची वाढली होती. या उपक्रमात ५०० कोटी रूपयांपेक्षा जास्त व्यावसायिक प्रस्ताव सादर झाल्याने लक्षवेधी यश प्राप्त झाले आहे. यावर्षीच्या प्रतिनिधींसाठी 'टेक पॅव्हेलियन' हा उपक्रमही फायदेशीर ठरला. या उपक्रमात १५ उद्योग भागीदार सामील झाले होते. त्यांच्याकडून १५.३६ कोटी रूपयांचे प्रायोजकत्वही प्राप्त झाले.

या महोत्सवात आंतरराष्ट्रीय चंदेरी जगतातल्या अनेक नामवंत कलाकारांनी हजेरी लावली होती. उद्घाटन सोहळ्यास भारतीय सिनेमासृष्टीला शताब्दी वर्षानिमित्त, भारतीय सिनेमाच्या समृद्ध वैविध्याला मानवंदना देण्यात आली. समारोप सोहळ्यात संगीत आणि नृत्याची शानदार मैफल सजली होती. यावेळी फिलीप नॉयरा यांना 'सत्यजीत रे जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तर अभिनेता विक्रांत मॅस्सी यांना या वर्षातील भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट व्यक्तिमत्त्वाचा अर्थात 'इंडियन फिल्म पर्सनॅलिटी ऑफ द इयर' हा पुरस्कार प्रदान करून गौरविले गेले.

या महोत्सवात झालेल्या प्रवेशिकांतून १८९ चित्रपटांची निवड करण्यात आली होती. यासाठी सुमारे १८०० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्या होत्या. त्यातून हे चित्रपट निवडले गेले. यात १६ जागतिक प्रिमियर, ३ आंतरराष्ट्रीय प्रीमीयर, ४४ आशियाची प्रिमियर व १०९ भारतीय प्रीमीअर यांचा समावेश होता. महोत्सवासाठी निवडल्या गेलेल्या ८१ देशांमधील विविध प्रकारचा संस्कृती, त्यांचे विचार, तत्वे, मते आणि दृष्टीकोनाचे आदर्श दर्शविण्यात आले. प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी १५ चित्रपटांमध्ये स्पर्धा होती तर युनेस्कोच्या गांधी पदकासाठी चित्रपट, दूरचित्रवाणी व दृकश्राव्य संवाद यासाठी १० चित्रपटांमध्ये अटीतटीची स्पर्धा होती. या महोत्सवात ऑस्ट्रेलियाचा विशेष लक्षवेधी देश म्हणून समावेश केला होता. त्यामुळे सर्वोत्तम ऑस्ट्रेलियन चित्रपटांचे स्क्रिनिंग केले गेले. इतकेच नव्हे तर उद्घानलाच मायकेल ग्रेसी दिग्दर्शित 'बेटर मॅन' या ऑस्ट्रेलियन चित्रपटाचा खेळ दाखविण्यात आला. 'टॉक्सिक' या लिथुआनियन चित्रपटाचे सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सुवर्ण मयुर पुरस्कार पटकावला. रोमानियन दिग्दर्शक बोगदान मरेसानु यांनी 'द इयर दॅट नेव्हर केम' साठी सर्वोत्कृष्ट रौप्य मयुर पुरस्कार मिळविला.

या महोत्सवात भारतीय चित्रपट सृष्टीतील चार दिग्गज व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या ऐतिहासिक सोहळ्यात अक्कनेरी नागेश्वरराव (ANR) राज कपूर, महमद रफी आणि तपन सिंह यांच्या उल्लेखनीय वारशाची शताब्दी साजरी करून या महोत्सवाने त्यांचे अतुलनीय योगदान यावर बारकाईने अभ्यास करून रचण्यात आलेले सर्वप्रथम, स्टॅम्प प्रकाशन, चित्रपट प्रदर्शन आणि आदीकारी करून पुन्हा सादर करून रसिकांना तृप्त केले. इफ्फीने आठवडाभरात ३० मास्टर क्लास, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित केले होते. त्यात चित्रपट सृष्टीतील मान्यवर सहभागी झाले होते. त्यात फिलीप नॉयरा, जॉन सील, रणबीर कपूर, ए.आर. रेहमान, ख्रिस किर्शबॅन, इम्तियाज अली, मणिरत्नम्, नागार्जुन, फारूक घोंडी, शिवकार्तिकेयन, अमिश त्रिपाठी आदींनी व्याख्यानांतून व चर्चेतून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

या महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार! हा पुरस्कार मराठी चित्रपट 'घरत गणपती' या चित्रपटाचे दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांनी पटकावला. या चित्रपटात कौटुंबिक नात्यातील भावनिक गुंतागुंत मोठ्या खुबीने टिपण्यात आली होती. उत्कट भावनिक नादमयतेमुळे पहिल्याच प्रयत्नात हा चित्रपट उत्कृष्ट व दर्जेदार बनल्याची कबुली परिक्षक मंडळाने दिली व नव्या दमाचा प्रतिभावान दिग्दर्शक म्हणून नवज्योतच्या कार्याची दखल घेण्यात आली. देशभर चित्रपट निर्मिती करणाऱ्या युवा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाने यंदाच्या इफ्फी आवृत्तीचा पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार नवज्योत बांदिवडेकर यांना देऊन त्यांचा योग्य तो सन्मान केला. हा सन्मान आपल्या परंपरेला व आधुनिक संवेदनात जोडणाऱ्या हृदयस्पर्शी कथेला व तिला सादर करणाऱ्या क्षमतेला आहे असे इफ्फीने जाहीर केले. नवज्योतचा सन्मान हा तमाम मराठी माणसांचा सन्मान आहे असेच आपण मानूया! ●●

## दामुअण्णा मालवणकर एक हरहुन्नरी अवलिया रंगकर्मी

श्रीराम शेट्ये





एका चित्रपट अभिनेत्यासाठी त्याचा चेहरा देखणा व व्यक्तिमत्व रूबाबदार असणे खुप महत्वाचे असते. तो साजेसा नसणे किंवा काही व्यंग असणे हे कलाकारासाठी संधी न मिळण्याचे प्रमुख कारण असू शकते.

परंतू काही कलाकार आपले व्यंग हिच संधी समजून आपली गुणवत्ता सिध्द करतात. अशा कलाकारांमध्ये हिंदी नाटक आणि चित्रपट अभिनेते ओम पूरी, मराठी अभिनेत्री ललिता पवार, अभिनेते मधू आपटे अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यापैकींच दामूअण्णा मालवणकर हे मराठी नाट्य आणि चित्रपटाच्या इतिहासातील एक असामान्य व्यक्तिमत्व होते. तिरळा डोळा असलेल्या दामूअणांनी आपले व्यंग हेच आपले वरदान असे मानून लहानपणापासूनच अभिनेते बनण्याची महत्वाकांक्षा मनी बाळगली. नूसती महत्वाकांक्षा न ठेवता त्यासाठी घरदार सोडून स्वत:ला रंगभूमीवर झोकून दिले. सुस्पष्ट शब्दफेक करण्याची एक वेगळी लकब आपल्या तिरळ्या डोळ्यामुळे विनोद निर्माण होईल याची प्रचंड दक्षता घेत नाटकातील एकेक पात्र जिवंत करण्याची विलक्षण उमेद त्यांना एका उच्च स्तरावर घेऊन गेली. त्यांनी साकार केलेले प्रत्येक पात्र हे परकाया प्रवेशासारखे जिवंत वाटू लागले. आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे दामुअण्णा प्रेक्षकांच्या समोर दिसले रे दिसले की आपोआपच विनोद निर्माण होत असे.

मराठी रंगभूमी ही खर तर चित्रपटांची जननी आहे. मराठी नाटकातूनच कलाकारांच्या अभिनयाचा कस लागतो. पुर्वीच्या काळी अनेक नाटककंपन्या होत्या. या कंपनीत काम करणारे कलाकार, संगीत साथ देणारी वाजंत्री मंडळी, सहाय्यक, मदतनीस, नेपथ्यकार अशी सगळी मंडळी एका कुटूंबासारखे रहात असत. त्यालाच नाटकाचे बिऱ्हाड म्हणत असत. हि सगळी मंडळी गावोगावी नाटकाचे बिऱ्हाड घेऊन दौऱ्यावर जात असत. तिकडेच जेवण वगैरे बनवले जाई व मुक्कामी राहून नाटकाचे प्रयोग केले जात असत. बालगंधर्वांची नाटक कंपनी अशा प्रकारे गावोगावी फिरत असे. अनेक नाटक कंपन्यातून चंद्रकात गोखले, दामुअण्णा मालवणकर, बालगंधर्व, राजा गोसावी यांच्यासारखे गाजलेले नट बिऱ्हाडी रहात असत.

या बिऱ्हाडी राहण्याची मजासुद्धा काही औरच होती नाटक आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात विनोदी अभिनेते दामूअण्णा यांनी विशिष्ट प्रकारे हसण्याची लकब, तिरळा डोळा आणि प्रभावी शब्दफेक याद्वारे आपले विशिष्ट स्थान निर्माण केले होते. एकेकाळी नाटक कंपनीच्या बिऱ्हाडी राहून दोनशे तिनशे रूपये नाईट घेणारे दामुअण्णा. एकदा दौऱ्यावर असताना अपघात झाला होता. त्यात त्यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले होते. त्या तशा अवस्थेतही ते चौकशी करीत होते की ''आपल्याला नाईट चे पैसे मिळतील ना?'' इतक्या परिस्थितीतून वर येऊन भरारी घेणारे. नंतरच्या काळात प्रगती झाल्यावर आपल्या डॉज सारख्या अलिशान गाडीतून फिरणाऱ्या दामू अण्णांचा अनेकांना हेवा वाटायचा. तो महाराष्ट्र आणि कर्नाटक वेगळे झाले तेव्हांचा काळ दामूअण्णा बापूशेठ मालवणकर यांचा जन्म कर्नाटक सीमेवरील निपाणी येथे झाला. त्यांच्या वडिलांचा सोनारकामाचा पिढीजात व्यवसाय होता. त्यामुळे दामूअण्णांनी त्यातच लक्ष घालावे अशी त्यांचे वडील बापूशेठ यांची अपेक्षा होती. पण त्यांना लहानपणापासूनच नाटकांचे वेड होते. घरातून या नाटकवेडाला विरोधच होता. त्यामुळे दामूअण्णा चोरून नाटके पाहत असत. तारुण्यात नाटकांच्या ध्यासामुळे त्यांनी घरातून पळून जाऊन महाराष्ट्र कंपनीत जाण्याचा प्रयत्न केला. मात्र वडिलांनी त्यांना परत आणून सोनारकामात लक्ष घालण्यास भाग पाडले. मात्र १९१३ साली ते पुन्हा एकदा घरातून बाहेर पडले आणि सांगलीला चित्ताकर्षक मंडळीत गेले. तिथे त्यांना बिनपगारी नोकरी मिळाली. चित्ताकर्षक कंपनीत दामूअण्णांना नाटकांच्या जाहिरातींचे फलक ढकलगाडीवर घालून रस्त्यावरून फिरवून आणण्याचे काम दिले गेले. त्या काळात ढकल गाडीवर फलक लाऊन नाटकाच्या जाहिराती केल्या जात असत. ज्या गावात नाटक असेल त्या गावात गावभर फिरून नाटकाच्या जाहिरातींचे फलक ढकलगाडीवरून फिरवले जात असत. पडतील ती कामे करण्यात दामुअण्णांचा वेळ जात असे. काही काळानंतर चित्ताकर्षक मंडळीच्या 'त्राटिका' या नाटकात दामूअण्णांना शिंप्याची भूमिका दिली गेली. ती भूमिका अगदी छोटी होती, मात्र त्यामध्ये त्यांनी प्रेक्षकांना भरपूर हसवले. हे साल होते १९१५. पुढे १९१६ साली चित्ताकर्षक कंपनी बंद पडली आणि दामअण्णा लोकमान्य नाटक मंडळीत गेले. तिथे त्यांनी मामा वरेरकर लिखित 'हाच मुलाचा बाप' या नाटकात डॉ. पशूची भूमिका अगदी तडफेने केली. त्यामुळे त्यांचा नावलौकिक होण्यास सुरुवात झाली.

१९१८ साली दामूअण्णा मालवणकर केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श मंडळीत गेले. तेथे त्यांना काम मिळाले नाही, तेव्हा ते दीनानाथ मंगेशकरांच्या बलवंत नाटक मंडळीत गेले. त्या कंपनीत त्यांनी 'पुण्यप्रभाव', 'मृच्छकटिक', 'भावबंधन', 'विद्याहरण', 'उग्रमंगल', 'सन्यस्त खड्ग', 'वेड्यांचा बाजार' वगैरे नाटकात भूमिका करून चांगलीच प्रसिद्धी मिळवली. पुढे १९३३-३४ साली बलवंत नाटक कंपनी बंद पडली आणि त्याचेच चित्रसंस्थेत रूपांतर झाले. त्यामुळे दामूअण्णा दीनानाथ मंगेशकरांकडेच राहिले. १९३४ साली आलेल्या 'कृष्णार्जुन युद्ध' या चित्रपटात त्यांना छोटीशी भूमिका देण्यात आली. चित्रपटातल्या त्यांच्या कामांची हीच सुरुवात होती. पुढे ३-४ वर्षात 'लक्ष्मीचे खेळ', 'सत्याचे प्रयोग', 'ठकीचे लग्न' वगैरे चित्रपटांत त्यांनी भूमिका केल्या.

त्यानंतर १९३८ साली ते कोल्हापूरला आले आणि त्यांनी मा. विनायक यांच्या 'ब्रह्मचारी' चित्रपटात आश्रम चालकाची भूमिका केली. या भूमिकेमुळे त्यांना चांगले नाव मिळाले. मा. विनायक यांच्या चित्रपटातच त्यांच्या अभिनयाला चांगला वाव मिळाला. विनोदी चित्रपटांचे नवे दालनच उभे करण्यात मा. विनायक यांना दामूअण्णा मालवणकरांनी मदत केली. १९३९ साली प्रदर्शित झालेल्या 'ब्रँडीची बाटली' या चित्रपटात त्यांनी नायकाची भूमिका साकारली. 'बगाराम'च्या भूमिकेत त्यांना आपल्या विनोदी अभिनयाला पूर्ण वाव देता आला आणि ही भूमिका लोकप्रिय झाली. त्यानंतर 'लग्न पहावं करून', 'सावकारी पाहुणे', 'गजाभाऊ' या चित्रपटांतूनही त्यांनी नायकाच्या भूमिका साकारल्या आणि आपल्या विनोदी अभिनयाचा प्रेक्षकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला. त्यानंतर मा. विनायक यांच्याकडे 'माझं बाळ', 'चिमुकला संसार', 'अर्धांगी', 'अमृत', 'सुखाचा शोध', 'संगम', 'पहिली मंगळागौर' या मराठी चित्रपटांत, तसेच 'सुभद्रा', 'बडी माँ' या हिंदी चित्रपटात विविध भूमिका केल्या. मा.विनायक यांच्या प्रत्येक चित्रपटात त्यांच्यासाठी खास विनोदी भूमिका असायचीच.

१९४७ साली मा. विनायक यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी 'चूल आणि मूल' या चित्रपटातून भूमिका केली. पुढे 'मोरूची मावशी' (१९४८), 'ब्रह्मघोटाळा' (१९४९), 'गळ्याची शपथ' (१९४९), 'बायको पाहिजे' (१९५०), 'देव पावला' (१९५०) या चित्रपटांत त्यांनी नायक म्हणून भूमिका केल्या आणि खऱ्या अर्थाने विनोदी अभिनेता म्हणून स्वत:चे आगळेवेगळे स्थान निर्माण केले. त्याशिवायही अनेक मराठी, हिंदी चित्रपटांतून त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या. सुरुवातीच्या काळात बिनपगारी, त्यानंतर दोन आणे रोजगारावर काम करत दामूअण्णा दोन हजार रुपये घेऊन भूमिका करीत असत.

चित्रपटातील लोकप्रियता शिगेला पोहोचली, तरीसुद्धा दामूअण्णांना नाटकाची आवड स्वस्थ बसू देत नव्हती. राजाराम नाटक मंडळीत गंगाधरपंत लोंढे दामूअण्णांना 'भावबंधन'मधल्या 'गोकुळ'च्या भूमिकेसाठी खास बोलावून घेत. त्या वेळी ते ३५० रुपये नाईटवर काम करत. १९४४ साली लोंढे यांचे निधन झाल्यावर दामूअण्णांनी 'प्रभाकर नाटक मंडळी' ही स्वत:ची संस्था सुरू केली आणि वीर माधव जोशी यांचे 'उधार-उसनवार' हे नाटक रंगमंचावर आणले. चित्रपटसृष्टीतले काम सांभाळून त्यांनी आठ वर्षे साऱ्या महाराष्ट्रभर नाटकांचे प्रयोग केले.

१९५२ साली ही नाटक कंपनी बंद पडल्यावर दामूअण्णांनी चित्रपट याच आपल्या कार्यक्षेत्रावर पुन्हा भर दिला. राम गणेश गडकरी यांचा 'तिंबूनाना', चिं.वि. जोशींचा 'चिमणराव' आणि ना.धों. ताम्हणकर यांचा 'दाजी धडपडे' हे तिन्ही मानसपुत्र साकार करत दामूअण्णांनी त्या व्यक्तिरेखांना अजरामर केले. त्यांनी जवळपास ७५ हिंदी-मराठी चित्रपटांतून व अंदाजे ५० नाटकांतून विनोदी भूमिका केल्या. वयाच्या ८३व्या वर्षी मुंबईत त्यांचे निधन झाले. आपल्या अभिनयाची छाप मराठी नाटक आणि चित्रपट विश्वात त्यांनी उमटवली. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**–email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)